अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०८.०८.२०२५ | अंक नं. १११ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



उपवासासाठी स्पेशल
टक्कर
मलाई लस्सी
कैलास उडपी। लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
खरेदी – खरेदीवर पॉइंट – पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सोन्याची राखी ₹ 777/- पासुन
चांदीची राखी ₹ 199/- पासुन
चांदीमधील 1000 पेक्षा अधिक डिझाईन उपलब्ध
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02


## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरक्षित जागेवर बेकायदेशीर बांधकाम

नगर – महापालिका हद्दीतील सावेडी विभागातील मिस्कीन मळा समोरील जागा महापालिका विकास आराखड्यानुसार शाळा व खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असून, सार्वजनिक हितासाठी राखीव आहे. तरीदेखील सदर जागेवर पुन्हा बेकायदेशीर बांधकाम उभे राहिले असून, याविरोधात शिवसेनेचे माजी नगरसेवक योगिराज गाडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना लेखी निवेदन देऊन तात्काळ कारवाईची मागणी केली.

गाडे यांनी या प्रकरणाची सविस्तर माहिती व सद्यस्थिती उपायुक्तांना देत, तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. तसेच जर महानगरपालिकेने तत्काळ कारवाई केली नाही, तर नागरिकांसह मनपा कार्यालयातच ठिय्या आंदोलन करून बेकायदेशीर बांधकाम पाडेपर्यंत संघर्ष केला जाईल, असा इशारा दिला.

सन २०१६ मध्ये महापालिकेने याच जागेवरील बेकायदेशीर बांधकाम हटविले होते, तरीही पुन्हा अवैध रचना उभी राहणे ही गंभीर बाब असल्याचे गाडे यांनी निवेदनात नमूद केले. सार्वजनिक वापरासाठी आरक्षित असलेली जागा मोकळी ठेवणे हा नागरिकांचा हक्क असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रशांत भाले, जेम्स अल्हाट, गौरव ढोणे, आनंद राठोड, प्रथमेश महिंदरकर, संदीप ठोंबरे, प्रशांत डेरेकर, मुन्ना भिंगारदिवे यांसह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी आंदोलना पर्यंत परिस्थिती जाणार नाही, महापालिका तात्काळ कारवाई करून ही शाळा व खेळाच्या मैदानासाठी आरक्षित जागा संरक्षित ठेवेल आणि बेकायदेशीर बांधकाम हटवेल, असे आश्वासन दिले.

(छायाचित्र पान ७ वर)

## कंपनीत माल द्यायचा असेल तर पैसे द्या नाहीतर गाडी जाळून टाकू

### एमआयडीसीमध्ये कच्चा माल पुरवठादारांकडून पैशांची मागणी करणाऱ्या चौघांवर खंडणीचा गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसीमधील एक्साइड इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीच्या गेटवर कच्चा माल पुरवठा करणाऱ्या वाहन चालकांना दमदाटी करून पैशांची मागणी करणाऱ्या आकाश बबन दंडवते (रा. सावेडी) याच्यासह इतर तीन अनोळखी व्यक्तींविरोधात खंडणीचा गुन्हा एमआयडीसी पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आला आहे.

या बाबत कंपनीचे एचआर प्रमुख निरंजन नंदकुमार कुलकर्णी (वय ३९, रा. गावडे मळा, अ.नगर, मूळ रा. सासवड, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. ६ ऑगस्ट रोजी पुण्यातून पाठवलेले चार टेम्पो कच्चा माल घेऊन एक्साइड कंपनीच्या गेट क्रमांक ३ वर पोहोचले होते. यावेळी आकाश दंडवते व त्याचे तीन साथीदार गेटवर आले आणि त्यांनी टेम्पो चालकांना आत सोडण्यास अडथळा निर्माण करत पैशांची मागणी केली. पैसे न दिल्यास गाडी जाळून टाकू, मारहाण करू अशा धमक्या देण्यात आल्या. कंपनीचे सिक्युरिटी सुपरवायझर विनायक काकडे यांनी हस्तक्षेप केल्यावर त्यांनाही दमदाटी करण्यात आली. वाहन चालकांनी यानंतर गेट नंबर १ द्वारे कंपनीत प्रवेश करत माल उतरवला.

७ ऑगस्ट रोजी सकाळी नाशिकहून आलेल्या कच्चा मालाची पिकअप गाडी कंपनीच्या ३ नंबर

(पुढील मजकूर पान ७ वर)

## माळीवाड्यात हॉटेलमध्ये वीज चोरी; गुन्हा दाखल

नगर – माळीवाडा परिसरातील ब्राम्हण गल्ली, बारातोटी कारंजा येथील हॉटेल अभिषेक येथे मीटर मध्ये फेरफार करून तब्बल १ लाख २३ हजार १८८ रुपयांची वीज चोरी केल्याचा प्रकार ७ ऑगस्ट रोजी उघडकीस आला आहे. या प्रकरणी महावितरणच्या भरारी पथकाने कारवाई करत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेंद्र हिरालाल राजपूत (वय ५५, रा. ठाकरेनगर, सिडको, छत्रपती संभाजीनगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीत म्हटले आहे की, ब्राम्हण गल्ली, बारातोटी कारंजा येथील हॉटेल अभिषेक येथे चैताली बाळासाहेब बोराटे यांच्या नावे असलेल्या ग्राहक क्रमांक १६२०१०७१२४९१ च्या मीटर मध्ये फेरफार करून, मागील १२ महिन्यांपासून ५ हजार २७९ युनिट वीज चोरी करण्यात आली आहे. या वीज चोरीची एकूण किंमत १ लाख २३ हजार १८८ रुपये इतकी असून तडजोड रक्कम ७० हजार रुपये इतकी आहे. वीज विभागाने केलेल्या कारवाईत हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेंद्र राजपूत यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चैताली बोराटे यांच्याविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास महिला पोलीस नाईक वर्षा पंडित करीत आहेत.


डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

केडगांवचे सुप्रसिध्द कंदी पेढेवाले
डिंक लाडू ३४०/- किलो
कंदी पिस्ता बर्फी ४००/- किलो
कंदी चॉकलेट बर्फी ४००/- किलो
कंदी खवा बर्फी ४००/- किलो
गुलाब जामून २८०/- किलो
मोतीचूर लाडू २००/- किलो
कंदी पेढा ४००/- किलो
मलाई बर्फी ५००/- किलो
मलाई पेढा ३२०/- किलो
ड्रायफ्रुट
राजेंद्र पेढेवाले
नगर-पुणे रोड, केडगांव वेशीजवळ, लक्ष्मीमाता मंदिराशेजारी, केडगाव, अहिल्यानगर.
संपर्क- 9225194066

41 वर्षे
श्रीफळ सदासर्वदा
मांगल्याचे
बंधन लाडक्या
बहिणीच्या प्रेमाचे
वर्धापन दिनानिमित्त आमच्या असंख्य ग्राहक, हितचिंतकांचे मन:पुर्वक आभार!
नारळी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!
AHP
Since - 1984
मे. अनिलकुमार हिरालाल पोखरणा ॲण्ड सन्स
नारळाचे प्रमुख व्यापारी
पोखरणा कॉर्नर, रामचंद्र खुंट, अहमदनगर. ९९२२५५६६१६
शाखा : गुळ गाळा नं. ३, मार्केट यार्ड, अहमदनगर. ८८७७८८३३१३
• संबंधित फर्म •
ॐ दुर्गा ट्रेडर्स
औरंगाबाद.
फोन : २३२७६०५
A.H. पोखरणा ज्वेलर्स
सर्जेपुरा, अ.नगर 83 53 050505 | सथ्था कॉलनी, अ.नगर 800 700 5001

राखी पौर्णिमेनिमित्त
सेल..सेल..सेल...
₹200/- पासुन ₹4000/-
पर्यंतच्या प्रिमियम कॉलीटीच्या साड्यांवर ५0% सुट
भरपूर व्हरायटीज्
मर्यादित स्टॉक
Terms & Conditions Apply.
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८






ॲड. डॉ. राजेंद्रजी अनभुले (सर)
हॅलो- 9822010099
ॲड. महेशजी तवले (भाऊसाहेब)
हॅलो- 9822222302
आमचे मित्र
8th August
ॲड. डॉ. राजेंद्रजी अनभुले
ॲड. महेशजी तवले यांना
वाढदिवसानिमित्त शुभेच्छा...
शुभेच्छुक
हॅलो ग्रुप
सर्व मित्र परिवार
अहिल्यानगर, पुणे, नाशिक

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन 'मुसाफिर'-९८२२०२०६९१

### क्रीडा क्षेत्रात नवा अध्याय... नवा सूर्योदय...

१ जुलैला केंद्राने 'खेलो भारत' नीती २०२५ या महत्त्वाकांक्षी धोरणाला मंजूरी दिली. मागील काही वर्षांमध्ये क्रीडा जगत भव्य दिव्य करण्यासाठी खूप उत्सुक आहे. आपला देशही तारुण्याने बहरलेला असल्याने खेळाच्या प्रगतीसाठी खेळाडूंसह सर्वच पुढे येत आहेत.



नवी खेलो भारत निती म्हणजे देशाच्या क्रीडा परंपरेला जागतिक स्तरावर नेण्याचे, प्रत्येक भारतीयाला खेळ जगताशी जोडण्याचे आणि खेळाला खऱ्या अर्थाने लोक चळवळ बनवण्याचे दूरदृष्टीचे खंबीर पाऊल आहे.

गेल्या दशकात क्रिकेटसह विविध खेळ प्रकारात अनेक खेळाडूंनी दैदीप्यमान यश मिळवून देशाची शान वाढवली आहे. अगदी ग्रामीण भागातही पाल्य व पालक खेळासाठी उत्सुक असून मेहनतीस तयार आहेत. कार्यरत आहे.

या नव्या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट भारताला जागतिक क्रीडा क्षेत्रात महासत्ता बनवणे व २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी तयारी करुन त्याच्या संभाव्य यजमान पदासाठी स्वत:ला तयार करणे आहे. महासत्तारुपी राष्ट्रनिर्मितीसाठी क्रीडा क्षेत्राचे सामर्थ्य वापरुन देशाचा सर्वांगिण विकास साधणे हा या धोरणाचा अन् विधेयकाचा मूळ उद्देश आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन व सक्षम पायाभूत सुविधा खेळाडूंच्या सराव व त्यातून यशासाठी आवश्यक असतात. या नव्या धोरणाने खेळाडूंची निवड व प्रगतीसाठी अत्याधुनिक डेटा विश्लेषण आणि क्रीडा विज्ञानाचा वापर होईल.

देशभरातून प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेण्यासाठी विशेष कार्यक्रम आखले जातील. त्यातून योग्य निवड, दुखापतीचे व्यवस्थापन, खेळाडूंचे मानसिक आरोग्य, कार्यक्षमता, पालकांचा व शासनाचा सहभाग, प्रायोजक या गोष्टींकडे लक्ष्य दिले गेल्याने भवितव्य उज्वल आहे.

यात खेळाला शालेय अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनवण्याचा प्रस्ताव आहे. खेळाला प्रमुख विषय बनवण्यासह एक व्यावहारिक करिअर पर्याय म्हणून प्रोत्साहन मिळेल. सार्वजनिक, खासगी भागीदारीद्वारा जागतिक दर्जाची प्रशिक्षण केंद्रे क्रीडांगण उभारली जातील. तेव्हा नव्या पिढीच्या खेळाडूंना तयार व्हा खेळून तंदुरुस्ती व करिअर उज्वल करायला...

# नागपूर - पुणे वंदे भारत ट्रेन बाबत...

## लहरी राजा.. प्रजा आंधळी अधांतरी दरबार.. अजब तुझे सरकार!

***नागपूर पुणे वंदे भारत बुलेट ट्रेन सुरू झाल्याबद्दल अनेकांनी श्रेयवादच्या नादात सोशल मीडियावर आनंद व्यक्त केला, परंतु पूर्ण माहिती नसल्यामुळे तो आनंद किती फसवा आणि निरुपयोगी आहे त्याविषयी...***



काल परवा पुणे नागपूर वंदे भारत गाडी सुरू करण्याची घोषणा झाली त्यामध्ये अहिल्यानगरचा आणि येथील नेतेमंडळींचा खरे म्हणजे काहीही संबंध नाही, तरी पण सोशल मीडियावर अनेक मंडळी त्या गाडीचा उद्देश त्याचे टाईम टेबल याचा अभ्यास न करता, आणि समर्थनिय श्रेय घ्यायच्या नादात आनंद व्यक्त करू लागली.. परंतु ही गाडी नगरकरांसाठी अजिबात उपयोगाची नाही याला कारण असे की..

वास्तविक त्यापैकी कोणीही त्या गाडीच्या वेळा त्याचे टाईमटेबल नीट पाहिले देखील नाही., या गाडीच्या तिकीट प्रणाली विषयी माहिती घेतली नाही, या गाडीचा अहिल्यानगर स्टेशन वरून पुण्याला जायचा आणि यायचा टाईम बिलकुल कुणालाही कशाच्या ही बाबत सोयीचा नाही... त्यामुळे नगर-पुणे इंटरसिटीचा हा तसूभरही पर्याय कधीच असू शकत नाही.

त्याचे टाईम टेबल जरा लक्षपूर्वक पाहिले म्हणजे समजेल की अहिल्यानगर स्टेशन वरून ही गाडी संध्याकाळी साडेसात वाजता निघून रात्री दहा वाजता पुण्याला जाणार आहे आणि नंतर पुण्याहून ही गाडी पहाटे साडेसहा वाजता निघणार आहे, आणि नगरला सकाळी साडेआठ वाजता येणार आहे. मग या गाडीने नगरकर पुण्याला काय रात्री फक्त मुक्कामाला जातील काय? आणि पहाटे सहालाच उठून परत मागे येतील काय? हे काय कामकाजाचे टाईम आहे का?

दुसरे म्हणजे या गाडीला ऐनवेळी साधे तिकीट मिळू शकत नाही, याला फक्त रिझर्वेशनच करावे लागते, आणि याच्या तिकिटाचा कमीत कमी चार्ज वंदे भारत च्या ठरवलेल्या नियमांनुसार पाचशे रुपये असू शकतो.. या गाडीच्या वेळा नगर-पुणे प्रवासाला कुठल्याही बाबतीत अजिबात सोयीस्कर आणि योग्य नाहीत, अर्थात नगर-पुणे प्रवास डोळ्यासमोर धरून या गाडीची उद्घोषणा मुळीच करण्यात आलेली नाही, हे लक्षात घेणे अतिशय गरजेचे आहे, केवळ पुणे-नागपूर प्रवास जलद गतीने व्हावा म्हणून वंदे भारत एक्सप्रेस सुरु झालेली आहे. त्यामुळे उगीचच नगर-पुणे, नगर-पुणे असा प्रवास जणू याच गाडीमुळे सोपा झाला अशी जनतेची समजूत करून देऊन श्रेय वादाच्या नादात उगीचच अजिबात संबंध नसलेल्या गाडीबाबत आनंद व्यक्त करण्यात काहीही अर्थ नाही.

वास्तविक सध्या पुण्याहून नागपूरला तीन-चार एक्सप्रेस नियमीत धावतच आहेत. पुणे नागपूर, गरीब रथ, आजाद हिंद वगैरे.. आणि पुण्याहून दररोज किमान तिनशे लक्झरी बसेस रोज नागपूरला जातात.. तरी देखील पुणे-नागपूर साठीच अजून एक वंदे भारत विद्रान रेल्वे मंत्रालयाला का सुरू करावीशी वाटली काही समजत नाही.

नगर-पुणे रस्ता वाहतूक प्रवासाची गंभीर दुरावस्था अजूनही कोणालाच समजलेली नाही., म्हणून तर रेल्वे मंत्रालयाकडून नगरकरांच्या मागणी कडे सतत दुर्लक्ष केले जाते.. आणि भलतीच आष्टी सारखी गाडी काहीतरी सुरु केली जाते.. जखम मांडीला आणि मलम शेंडीला

नगरचे लोक फार फार तर या वंदे भारत ने शेगांव चा विचार करू शकत होते, तर त्यासाठी या गाडीला शेगांवला थांबा देखील नाही..

आजच्या मितीला पुणे-नगर दरम्यान अशा किमान दहा रेल्वे गाड्या नगरकरांच्या दृष्टीने गैरसोयीच्या आणि अवेळी धावतच आहेत, परंतु त्यापैकी नगरहून सकाळची अमरावती-पुणे आणि पुण्याहून संध्याकाळची तिकडून येणारी झेलम वगळता एकही गाडी नगरी जनतेसाठी कामाची नाही..

नगर-पुणे हा अवघा १२० किलोमीटर चा आजचा प्रवास जो तब्बल सहा तासाच्या घरात पोहोचलेला आहे, तो जर आता सुखकर करायचा असेल तर सकाळी लवकर पुण्याला जाणारी आणि पुण्याहून संध्याकाळी निघणारी इंटरसिटी रोज सुरू होणे हाच त्याला एक मात्र पर्याय आहे., वंदे भारत एक्सप्रेस हा लांब पल्यांची अंतरे लवकर कापण्यासाठी आयोजित केलेला उपाय आहे.. त्याचे नगर-पुणे प्रवासाशी काही देणे घेणे नाही, त्यामुळे उगीचच सिमल्या मध्ये बर्फ पडला म्हणून इकडे नगरमधे स्वेटर घालण्यात अर्थ नाही.

आम्ही गेल्या पाच वर्षापासून नगर-पुणे प्रवासाच्या बाबत अनेक आंदोलन करीत भीषण वास्तव मांडत आलेलो आहोत. पण प्रशासनाकडून ठोस उपाययोजना, ना रस्ते वाहतुकीच्या बाबत घडते आहे, ना पर्यायी रेल्वेच्या बाबत घडते आहे. उलट हास्यास्पद प्रकार असा आहे ७०० प्रवासी क्षमता असलेल्या या गाडीतून सात देखील प्रवासी प्रवास करत नाही, जी दररोज जवळजवळ मोकळी धावते.. अशी आष्टीला जाणारी डेमु रेल्वे मात्र लाखो करोडो रुपयांचा तोटा सोसुन रोज ७०, ८० हजार रुपयांचे डिझेल जाळून आजही गेल्या ३ वर्षापासून दररोज चालू आहे..

नगर-पुणे इंटरसिटी मात्र अजून दोन-तीन वर्षे सुरू होत नाही, तोपर्यंत रस्त्यावरची वाहतूक अजून दोन-तीन पटीने वाढेल आणि तिचाही उपयोग होणार नाही.. लहरी राजा.. प्रजा आंधळी अधांतरी दरबार ..अजब तुझे सरकार!

- **सुहासभाई मुळे,** अध्यक्ष, जागरूक नागरिक मंच ९००२६६८५५५

# महात्मा फुले नामफलकाची विटंबना करणाऱ्यावर कारवाई करा

## माळी महासंघाच्या वतीने घटनेचा तीव्र निषेध, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल भारती यांना निवेदन

नगर - राशीन ता. कर्जत येथील काही समाज कंटकांनी क्रांती ज्योती महात्मा फुले नामफलकाची व चौकातील चौथऱ्याची तोडफोड करून विटंबना केली. सदर घटनेचा तीव्र निषेध करून माळी महासंघाच्या वतीने उपविभागीय अधिकारी अमोल भारती यांना निवेदन देण्यात आले. यानंतर माळीवाडा वेस येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास दुग्ध अभिषेक घालून विधिवत पुजा करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भूषण भुजबळ, ओबीसी व्हिजेएनटी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, अभय आगरकर, बाळासाहेब बोराटे, जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, महासचिव विवेक फुलसौंदर, जिल्हा उपाध्यक्ष मनोज भुजबळ, राहुल साबळे, शहर अध्यक्ष मनोज फुलसौंदर, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष संदीप दळवी, कर्मचारी आघाडी जिल्हाध्यक्ष तुषार फुलारी, सचिव गणेश धाडगे, कर्मचारी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र बोरुडे, भिंगार शहर अध्यक्ष योगेश फुलारी, नगर तालुका अध्यक्ष भगवान हजारे, उद्योजक आघाडी शहर अध्यक्ष दिनेश कापरे, शहराध्यक्ष अमोल रासकर, सांस्कृतिक आघाडी तालुका अध्यक्ष शिवाजी धाडगे, ज्येष्ठ आघाडी जिल्हा उपाध्यक्ष रोहिदास हराळे, रवींद्र धाडगे, विनायक रानमळकर, अशोक ताठे, संतोष झोडगे, गणेश पांढरे, योगेश धाडगे, रामदास फुले, जालिंदर बोरुडे, अनिल इवळे, गणेश कोल्हे, सुधाकर कानडे, भिमाजी दादा जाधव, अमोल धाडगे, कल्याणी गाडळकर आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. क्रांतीसुर्य महात्मा फुले हे सर्व समाजाचे आदर्श आहेत. महात्मा फुले यांनी सर्व समाजासाठी शिक्षणाची द्वारे खुली केली आहेत. राशीन येथे घडलेली घटना निंदनीय आहे.

सदर घटनेने समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. विटंबना करणाऱ्या समाजकंटकांवर प्रशासनाने कारवाई करावी अन्यथा माळी महासंघ रस्त्यावर उतरेल, असा इशारा देण्यात आला आहे.



राशीन (ता. कर्जत) येथील काही समाज कंटकांनी क्रांती ज्योती महात्मा फुले नामफलकाची व चौकातील चौथऱ्याची तोडफोड करून विटंबना केली. सदर घटनेचा तीव्र निषेध करून माळी महासंघाच्या वतीने उपविभागीय अधिकारी अमोल भारती यांना निवेदन देण्यात आले.

## एस.टी.बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर - नगरहुन सुप्याकडे जाणाऱ्या मोटारसायकल ला एस.टी.बसने जोरदार धक्का दिल्याने दुचाकीवरील एकाचा जागीच मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला आहे. ही घटना नगर पुणे रोडवरील कामरगाव शिवारातील हॉटेल स्माईल स्टोन समोर २ ऑगस्ट रोजी सकाळी घडली.

ओमप्रकाश रामकिशोर (वय ३४, रा. अयाह, फतेहपूर, उत्तरप्रदेश, हल्ली रा.शेंडी ता.नगर) असे मयताचे नाव आहे. याबाबत राकेशकुमार ग्यानी (वय ३४ रा. पखरौली, ता. फतेहपूर, उत्तरप्रदेश, हल्ली रा.शेंडी ता.नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात ७ ऑगस्ट रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांचे मेव्हणे ओमप्रकाश रामकिशोर यांच्यासह बजाज पल्सर दुचाकी (क्र. एम एच १६ बी एस ६९६५) ने शेंडी येथून सुप्याकडे कामासाठी जात असताना कामरगाव शिवारात, हॉटेल स्माईल स्टोनजवळ, ते एका कारला ओव्हरटेक करत असताना, पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या एस.टी. बस (क्र. एम एच १४ बी टी ४२६१) चालक तुकाराम तोलाजी सुळ, (शेगाव आगार) याने दुचाकीला जोरदार धक्का दिला. या धक्क्याने दुचाकी वरील दोघेही रस्त्यावर पडले. दुर्दैवाने बसचे चाक ओमप्रकाश रामकिशोर यांच्या डोक्यावरुन गेल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ सिव्हिल हॉस्पिटल, येथे दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी नगर तालुका पोलिसांनी राकेश कुमार ग्यानी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बस चालक तुकाराम सुळ यांच्याविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एकनाथ आव्हाड हे करीत आहेत.


## इमरतबाई गांधी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - माणिकनगर अहिल्यानगर येथील रहिवासी इमरतबाई कचरदास गांधी (वय ९९) यांचे ७ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या डॉ. विजय भंडारी यांच्याकडे बराच वर्षांपासून राहात होत्या. त्या झुंबरलाल हस्तीमल मुथ्था यांच्या आत्या होत. त्यांनी आयुर्वेद महाविद्यालय येथे देहदान केले.

## माणकचंद मुनोत यांचे अल्प आजाराने निधन

नगर - पनवेल येथील रहिवासी माणकचंद चुनीलाल मुनोत (वय ८७) यांचे ६ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पनवेल स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. मनोज, मनिष, मिना यांचे वडील होत. इंजि. अमृतलाल मुथ्था, सुनील मुथ्था यांचे मेहुणे होत.

## ताराबाई बोरा यांचे अल्प आजाराने निधन

नगर - सुखदा अपार्टमेंट, माणिक चौक येथील रहिवासी श्रीमती ताराबाई बोरा (वय ८०) यांचे ७ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंसकार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विश्वदर्शन फर्मचे, महावीर बायोडाटा व स्नेहालयचे प्रवीण बोरा यांच्या त्या मातोश्री होत तर स्व. रमेश बोरा यांच्या त्या पत्नी होत.



महिला कार्यकर्त्यांचा छळ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा, या मागणीसाठी स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

# महिला कार्यकर्त्यांचा छळ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

### स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने, महात्मा फुले स्मारकाच्या तोडफोडचा निषेध

नगर - महिला कार्यकर्त्यांचा मानसिक व शारीरिक छळ करुन जातिवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी छत्रपती संभाजीनगर पोलीस स्टेशन व कोथरूड पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांवर तात्काळ अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट इतर कलमान्वये गुन्हा दाखल व्हावे आणि मिरजगाव (ता. कर्जत) येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकाची तोडफोड करणाऱ्यांवर कठोर कारवाईच्या मागणीसाठी स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात सुशांत म्हस्के, रोहित आव्हाड, संजय कांबळे, अविनाश कांबळे, विजय भांबळ, प्रतीक बारसे, विवेक भिंगारदिवे, सुनील साळवे, सिद्धांत कांबळे, विजय शिरसाठ, युवान चाबुकस्वार, शेखर पंचमुख, विनोद साळवे, शिवाजी भोसले, नवीन भिंगारदिवे, मोहन शिरसाठ, शंकर भिंगारदिवे आदींसह युवा कार्यकर्ते सहभागी झाले होते.

पोलीस प्रशासनातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण पोलीस खाते बदनाम होत आहे. या प्रकरणातील तीन युवतींचा छळ करुन जातिवाचक शिवीगाळ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट व इतर कलमान्वये गुन्हा दाखल व्हावे, मिरजगाव (ता. कर्जत) येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकाची तोडफोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# ट्रान्सपोर्टच्या कार्यालयाचा दरवाजा तोडून रोकड लंपास

नगर - ट्रान्सपोर्टच्या कार्यालयाचा दरवाजा व भिंत फोडून आत प्रवेश करुन आतील १० हजार रुपयांची रोख रक्कम आणि ऑफिस-मधील महत्त्वाचे दस्तावेज चोरून नेल्याची घटना जे.जे. गल्ली, मंगलगेट येथील मिरा ट्रान्सपोर्ट कार्यालयामध्ये ७ जुलै रोजी मध्यरात्री १२.३० च्या सुमारास घडली.

या बाबत सर्फराज इनायत बेग (वय ५०, रा. प्लॉट नं. २५, मिर्झा हाऊस, मुकुंदनगर, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी यांचे मिरा ट्रान्सपोर्ट नावाचे कार्यालयजे.जे. गल्ली, मंगलगेट येथे आहे.५ जुलै रोजी रात्री ८.३० वाजता कार्यालय बंद करून ते घरी गेले होते. दरम्यान, ७ जुलै रोजी मध्यरात्री १२.३० च्या सुमारास मोहरम मिरवणूक संपल्यानंतर ते आपल्या मोटारसायकलकडे गेले असता, त्यांना त्यांच्या ऑफिसजवळ इसरार उर्फ टकलु मुक्तार शेख (रा. कोठला झोपडपट्टी) हा ड्रिल मशीनच्या सहाय्याने दरवाजा व भिंत फोडताना दिसला.

त्यावेळी फिर्यादी हे एकटे असल्यामुळे त्यांनी भीतीपोटी त्याला थांबवले नाही. मात्र,काही अंतरावरुन त्यांनी पाहिले असता इसरार याने दरवाजा व भिंतीची तोडफोड केली असून कार्यालयातील लाईट्स, लाकडी टेबल, रजिस्टर, रोजमेळ पुस्तके आणि ड्रॉवरमधील १० हजार रोख रक्कम चोरुन नेली.

याप्रकरणी तोपखाना पोलीस ठाण्यात सर्फराज बेग यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उर्फ टकलू शेख याच्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास तोफखाना पोलीस करीत आहेत.

# डॉन बॉस्को परिसरामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांकडून दहशत, छेडछाड

## कठोर कारवाई करण्याची पोलीस निरीक्षकांकडे महिलांची मागणी

नगर - डॉन बॉस्को परिसरामध्ये अल्पवयीन मुले व त्यांचे मुख्य सूत्रधार यांच्याकडून नागरिकांना त्रास होत असून दहशत निर्माण करून महिलांची व मुलींची छेडछाड करत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या ठिकाणी महापालिकेकडून ख्रिस्ती बांधवांसाठी समाज मंदिर बांधून दिले असून या ठिकाणी डॉन बॉस्को व नागापूर परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तीचे मुले एकत्रित येऊन दारू, गांजाचे व्यसन करत असतात तसेच त्यांच्याजवळ हत्यारे असतात रात्री अपरात्री या ठिकाणी मोठमोठ्याने गोंधळ घालत असतात. त्यामुळे मुला-मुलींना घरामध्ये बंद करून ठेवावे लागते तसेच या ठिकाणी शाळा क्लास असून मुलांना सोडवण्यासाठी जात असताना ही टूकार मुले छेडछाड करत असतात. या मुलांचा पोलीस प्रशासनाने कायदेशीर कारवाई करून बंदोबस्त करावा अशी मागणी डॉन बॉस्को परिसरातील महिला नागरिक यांनी तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे. यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, डॉ. सागर बोरुडे आदींसह महिला उपस्थित होते

संपत बारस्कर म्हणाले की, डॉन बॉस्को परिसरातील नागरिक गुंडगिरी करणाऱ्या मुलांकडून त्रस्त झाले आहे त्यांच्यावर कुठल्याही प्रकारे कायद्याचा धाक उरला नाही, ते अल्पवयीन असल्याचा फायदा घेत दहशत निर्माण करत आहे अल्पवयीन मुलांच्या आई-वडिलांनी देखील आपल्या मुलांना शिस्त लावावी, जेणेकरून आपला मुलगा गुन्हेगार होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. पोलीस प्रशासनाने तातडीने उपयोजना करत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांवर कारवाई करावी याचबरोबर महापालिकेच्या माध्यमातून डॉन बॉस्को परिसरामध्ये सांस्कृतिक भवन उभे राहिले असून या ठिकाणी महापालिकेच्या माध्यमातून अंगरक्षक व सीसीटीव्ही कॅमेरे बसून देण्याची मागणी आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे ते म्हणाले.

सागर बोरुडे म्हणाले की डॉन बॉस्को परिसरातील महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून या टुकार गँगचा बंदोबस्त तातडीने होणे गरजेचे आहे पोलिसांनी कायद्याचा धाक दाखवत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी पोलीस प्रशासनाकडे केले आहे याचबरोबर महापालिकेने देखील या परिसरामध्ये लाईटची सुविधा उपलब्ध करून द्यावी असे ते म्हणाले



डॉन बॉस्को परिसरामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांकडून गैरकृत्य होत असून याबाबत कठोर कारवाई करण्याची पोलीस निरीक्षकांकडे नागरिकांच्यावतीने करताना संपत बारस्कर. (छाया - लहू दळवी)

तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे म्हणाले की, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांना कायद्याच्या जोरावर आपण नीट करू, महिलांनी घाबरायचे कारण नाही, पोलीस तुमच्याबरोबर आहेत, तुम्ही फक्त तक्रार द्या, या भागामध्ये सातत्याने पोलीस गस्त घालत आहे, अल्पवयीन मुले असल्यामुळे कायद्याचे काही बंधन येत असतात त्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करता येत नाही, तरी आपल्या आई-वडिलांनी मुलांना गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांबरोबर राहून देऊ नका, गुन्हेगारांना सरळ करण्याचे काम पोलीस प्रशासन करेल नागरिकांनी देखील पोलिसांच्या संपर्कात राहून घडलेल्या घटना सांगितल्या पाहिजे व त्याची तक्रार देखील दिली पाहिजे असे ते म्हणाले.

# गृहिणी

## आरोग्य

❉ आपण सकाळी १० ते ११:३० या दरम्यान कॉफी पिणे पसंत करत असाल तर ही उत्तम वेळ आहे जेव्हा कार्टीसोल स्तर कमी असतो. या वेळेस कॉफी पिणे आपल्यासाठी सुरक्षित आहे.

❉ ४ दुपारी १२ ते १ कार्टीसोल स्तर पुन्हा वाढतो म्हणून या दरम्यान कॉफी पिणे नुकसानदायक ठरेल.

❉ दुपारी १ पासून कार्टीसोल स्तर कमी व्हायला लागतो म्हणून १ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कॉफी पिण्याची उत्तम वेळ आहे जेव्हा कॉफी नुकसान न करता ऊर्जा प्रदान करेल.

## पाककला

### शाही खिचडी

**साहित्य –** ३ वाट्या दिल्ली राईस, दीड वाटी मुगाची डाळ, १ बटाट्याचे मध्यम काप, हिंग, हळद, १ वाटी मटार दाणे, २ कांदे, २ इंच आलं, तूप, १५-२० लसूण पाकळ्या, मिरच्या, दही, थोडे काजू, बदाम, बेदाणे, जिरे, मीठ, गरम मसाला आणि सुक्या मिरच्या.

**कृती –** खिचडी करण्याच्या आधी १ तास अगोदर डाळ व तांदूळ एकत्र करून धुवून ठेवावे. कांदे उभे पातळ चिरावे. पातेल्यात तूप तापवून काजू, बदाम, बेदाणे तळून घ्यावे. त्याच तुपात कांदा तळून घ्यावा. कांदा लालसर कुरकुरीत तळावा. आलं-लसणाची पेस्ट करावी. पातेल्यात तूप तापवून हिंग, जिरे, हळद, सुक्या मिरच्या आणि आलं-लसूण पेस्ट घालून हे सर्व जिन्नस परतावे. त्यात डाळ, तांदूळ, बटाटे, मटार दाणे टाकावेत. ते चांगले परतून तांदळाच्या दुप्पट पाणी घालावे. चवीनुसार त्यात मीठ, गरम मसाला घालून मंद आचेवर खिचडी शिजू द्यावी. खिचडी वाढताना ती गरमागरमच वाढावी.

## सल्ला

❉ कंबरदुखी असल्यास खारका खाणे फायदेशीर असते.

❉ देवघरांचे लाकडी फर्निचर नेहमी घरात वा झाकून ठेवावे; हिवाळ्यात त्यात भेगा पडू शकतात.

❉ फर्निचर आर्द्रतेपासून वाचवण्यासाठी रात्री पातळ पॉलिथिनने झाकावे.

## सौंदर्य

❉ पुदिन्यांची पाने वाटून लावल्यास मुरमे-पुरळाच्या त्वचेवर लाभदायक ठरतात.

❉ तैलग्रंथी उन्हाने जास्त सक्रीय होतात. त्यामुळे त्वचेची विशेषतः तेलकट त्वचेची जास्त देखभाल करावी लागते. कारण अशा त्वचेवर मुरमे, ब्लॅक व व्हाईट हेड्स जास्त होतात. यासाठी उन्हाळ्यात ॲण्टिसेप्टिक फेस पॅक वापरावा.

## वास्तू

बुद्धाची मूर्ती घराच्या मुख्य दरवाजा समोर लॉबीत किंवा बैठकीच्या खोलीत ठेवावी. मूर्तीचे तोंड मुख्य दरवाजाकडे असले पाहिजे आणि ती घरात प्रवेश केल्याबरोबर ताबडतोब दिसेल, अशा प्रकारे उंचावर ठेवावी.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५

**रक्षाबंधन, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, श्रवण १४|२४, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे.

**वृषभ :** व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**मिथुन :** आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल. शत्रूंपासून सावध राहा.

**कर्क :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. विशेष वित्तीय अडचणींवर चिंतन.घरात मंगल कार्याचा योग.

**सिंह :** जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील.

**कन्या :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**तूळ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. तुमच्या सार्मथ्यात वाढ.

**वृश्चिक :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**धनु :** रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. आळस करू नये, कामे वेळेत करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.


**कुंभ :** घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

**मीन :** सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. मतभेदांपासून लांब रहा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२३८

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) जंगलाचा राजा; केसरी; सिंह; वनराज २) एक मोगल राजा ६) विष्णू ७) नवीन नसलेला; पुराणा ८) स्वाक्षरी; सिग्नेचर ९) भरलेले; घट्ट; गच्च १०) या झाडाच्या फळाऐवजी फूल खाल्ले जाते; भल्लातक; भिलावा ११) काविळेची तिसरी पायरी ज्यात पोट फुगते व शरीर पिवळेजर्द होते १२) सारा; धान्याचे दर; नदीचा प्रवाह; दर; भाव १४) सावध रहा; खबरदार; ध्यानात धर १६) चैतन्य; शुद्धी; अंत:करणाची १८) बगल १९) आकाशात विहार करणारे; पक्षी; खग २०) पिसारा फुलविणारा भारताचा राष्ट्रीय पक्षी

**उभे शब्द :-** १) अगदी सारखे; तुल्य २) या शहराला मराठवाड्याची राजधानी असे म्हटले जाते ३) मौज; रंगविण्याचे साधन; कलर ४) खंडोबाचे देवस्थान ५) रचना; घडण; नकली ९) अतिशय वेगात १०) एक वाद्य १३) कृष्णाची एक प्रेमिका; पालनपोषण करणारी कर्णाची माता १४) उसापासून बनणारा एक गोड पदार्थ १५) मोठे गाव; शहर १६) वाटा; हिस्सा १७) डाग; वस्तू; पर्वत १८) ताडकन फुटणारी एक वस्तू

**शब्दगंध क्र. ७२३७ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२०० चे उत्तर**



# ❉ ❉ ❉ ❉ ❉ ❉ मुलांचे विश्व ❉ ❉ ❉ ❉ ❉ ❉

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : नम्रता म्हणजे ज्ञानाचा मापदंड आहे. – **महावीर स्वामी.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### टॉन्सिल्स् म्हणजे नेमके काय?

टॉन्सिल्स म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. टॉन्सिल्स म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. परंतु त्यांनाच जेव्हा जंतूंचा प्रादुर्भाव होऊ लागतो, तेव्हा त्यांचे गृहीत कार्य नाहीसे होते आणि प्रतिजैविके देऊन त्यांचेच संरक्षण करण्याची वेळ येते. अन्यथा शरीरावर अपायकारक परिणाम होऊ लागतात. टॉन्सिल्स म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. टॉन्सिल्स म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. परंतु त्यांनाच जेव्हा जंतूंचा प्रादुर्भाव होऊ लागतो, तेव्हा त्यांचे गृहीत कार्य नाहीसे होते आणि प्रतिजैविके देऊन त्यांचेच संरक्षण करण्याची वेळ येते. अन्यथा शरीरावर अपायकारक परिणाम होऊ लागतात. टॉन्सिल्स (गलवाताम) म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. घशात जिभेमागे (पॅलेटाइन टॉन्सिल्स – तालु गिलायू), नाकामागे (ॲडेलॉइड्स- ग्रसनी गिलायू) व जिभेवर (लिंग्वल टॉन्सिल्स – जिव्हा गिलायू) टॉन्सिल्स असतात. या सर्वांनी मिळून वर्तुळाकार वाल्डेयर्ल्स रिंग (Waldeyerls ring) बनते. पांढऱ्या संरक्षक पेशींचे हे गड्डे. परंतु त्यांनाच जेव्हा जंतूंचा प्रादुर्भाव होऊ लागतो, तेव्हा त्यांची गृहीत कार्य करण्याची क्षमता संपते आणि प्रतिजैविके देऊन त्यांचेच संरक्षण करण्याची वेळ येते. अन्यथा शरीरावर अपायकारक परिणाम होऊ लागतात. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. टॉन्सिल्स लसिकाभ नावांच्या ऊतींपासून बनलेले असतात. या ऊतींपासून रक्तातील पांढऱ्या पेशींची (लसिका पेशींची) निर्मिती होत असते. या पेशी संक्रमणाचा प्रतिकार करतात. उदाहरणार्थ, जेव्हा शरीरावर जिवाणू किंवा विषाणूंचे संक्रमण होते तेव्हा लसिका पेशी त्यांचा नाश करतात तालू टॉन्सिल्सवर अनेक खळगे असतात. जिवाणू आणि अन्नकण या खळग्यांमध्ये अडकले जातात. शरीरात टॉन्सिल्सचे महत्त्व ६-१० वर्षांपर्यंत असते. तोपर्यंत प्रतिकारशक्ति करिताचे बाकी अवयव विकसित होतात. मुले जशी वयाने वाढतात तसे त्यांच्या टॉन्सिल्सचा आकार लहान होतो. श्वसनमार्गातील सूक्ष्मजीवांना प्रतिकार करताना टॉन्सिल्सच्या पृष्ठभागावरील खळग्यांत सूक्ष्मजीवांचा शिरकाव झाल्यास त्यात पू होऊ शकतो. काही वेळा संक्रमणामुळे टॉन्सिल्सदाह होतो आणि त्या सुजतात. वेदना दूर करण्यासाठी विश्रांती, मिठाच्या गुळण्या, वेदनाशामक गोळ्या दिल्या जातात. जिवाणूंचे संक्रमण असल्यास प्रतिजैविके देतात. मात्र विषाणूंचे संक्रमण झाल्यास टॉन्सिल्सशोथावर (ॲक्युट टॉन्सिलिटीस) प्रतिजैविकांचा काही उपयोग होत नाही. सामान्यपणे १०-४० वर्षे वयापर्यंतच्या व्यक्तीला हा आजार होऊ शकतो.

१. तीव्र टॉन्सिल्सशोथामध्ये एकाएकी थंडी वाजून ताप भरतो.

२. घसा दुखू लागल्याने गिळण्यास त्रास होतो.

३. सर्दी, खोकला येतो.

४. अरुची, अस्वस्थपणा वगैरे लक्षणेही दिसतात.

५. जबड्याच्या हाडामागे अवधानाच्या गाठी (लिम्फ नोड्स) वाढतात.

६. ग्रसनी टॉन्सिल्स (ॲडेनॉइड्स) वाढल्याने वा त्यांच्या शोथाने झोपताना श्वास घेण्यास अडथळा येतो. नाक बंद राहिल्याने टाळा वर उचलला जातो. नाक बसते व दात पुढे येऊ लागतात.

७. श्वासास दुर्गंधी येऊ लागते.

८. कान दुखतो वा फुटतो. कान-नाक-घसा तज्ज्ञ ऑपरेशन करताना योग्य काळजी घेतातच परंतु भुलीचे, रक्तस्रावाचे, जंतू-संसर्गाचे धोके लक्षात ठेवावेच लागतात. डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे महत्त्वाचे असते. गरम, बोचतील असे कडक, तळकट, आंबट, तिखट पदार्थ ८-१० दिवस वर्ज्य करावेत. गुळण्या करून घसा स्वच्छ ठेवणे, औषधे घेणे, बोलावल्यानुसार तपासणीस जाणे गरजेचे असते.

## अजब ज्योतिषी

एक ज्योतिषी बाजारात बसून लोकांचे भविष्य सांगत असे. त्याचा धंदा अगदी छान चालला होता. ज्योतिष ऐकण्यासाठी त्याच्याकडे लोकांची नेहमीच गर्दी असे. त्यातून त्याला पैसाही बरा मिळे. लोकांचा त्याच्या ज्योतिषावर विश्वास होता. त्यामुळे त्याच्याकडील गिऱ्हाईकही वाढत चालले होते.


एका दिवसाची गोष्ट. तो एका इसमाचे ज्योतिष सांगण्यात गुंतला असतानाच त्याच्या शेजारी त्याच्याकडे धावत आला आणि म्हणाला, ''ज्योतिषीभाऊ, अहो तुमचं घर चोरांनी फोडलं आणि त्यातलं सगळं लुटून नेलं. चला, पळा लवकर.'' शेजाऱ्याचे बोलणे ऐकून घाबरलेल्या ज्योतिषाने आपले सामान लगबगीने गोळा केले आणि तो घरी जायला निघाला. न राहून ज्योतिष विचारायला आलेल्या एका इसमाने त्याला विचारले,

''ज्योतिषीभाऊ, मला तुमचं आश्चर्य वाटतंय तुम्ही दुसऱ्यांचे ज्योतिष सांगता आणि ते खरंही असतं. मग तुमच्या घरी चोरी होणार आहे, हे तुम्हाला अगोदर कसं नाही कळलं?''

''अहो कसं कळणार! मी दुसऱ्यांचे ज्योतिष सांगतो त्याबद्दल मला पैसे मिळतात. स्वत:चं ज्योतिष पाहून मला थोडेच पैसे मिळणार होते? म्हणून मी ते पाहिलंच नाही बघा. कधी कधी असंच होतं. आपल्या व्यवसायाचा इतरांना फायदा होतो. मात्र स्वत:च्या कुटुंबाला त्याचा फायदा होत नाही. माझं तसंच झालंय''

**तात्पर्य :** बऱ्याचदा आपल्याच पेशाचा आपल्याला लाभ होत नाही.

# जीवन का अमृत (भाग १)



प्रभु ने हमें बीमारियों में फंसा दिया, भोगों में उलझा दिया और हम अपनी जिंदगी रोगों और भोगों में गुजार रहे थे।

**गुरु जोगी कर सबै छुड़ायौ ।**

गुरु हमें रोगों और भोगों से छुड़ाकर परमात्मा से मिला देता है। जब हमारी आत्मा परमात्मा से मिल जाती है, तो ये सारे रोग, भोग फीके पड़ जाते हैं, उनसे कई गुना ज़्यादा लज़्ज़त हमें मिल जाती है, हम उनसे छुटकारा पा लेते हैं।

हम अपने घरों में रहते हुए भी परमात्मा को पा सकते हैं। संत दर्शनसिंहजी महाराज कहा करते थे कि संत-मत का रास्ता 'Positive Mysticism' (सकारात्मक-अध्यात्म) का है। प्रभु पाने के लिए घर-बार को छोड़ने की ज़रूरत नहीं है, हमें पहाड़ों पर जाने की आवश्यकता नहीं है। अपनी घर-गृहस्थी में रहते हुए किसी पूर्ण महापुरुष के मार्गदर्शन और दयामेहर से हम प्रभु को पा सकते हैं। आगे सहजोबाई जी फरमा रही हैं :

## गुरू और परमात्मा

**हरि ने करम भरम भरमायौ।**

प्रभु ने हमें कर्मों के जाल में फंसा दिया, भ्रम में डाल दिया। हम हमेशा एक दूसरे पर शक करते रहते हैं, हमारे अलग-अलग भ्रम हैं। किसी को कुछ डर लगता है, किसी को कुछ और क्योंकि हमें कुछ समझ में नहीं आता। जब किसी चीज़ को हम समझ लेते हैं, तो फिर हमें डर नहीं लगता। लेकिन बात सही समझ न आने पर हम किसी न किसी भ्रम में पड़े रहते हैं। कर्मों के विधान में हम फंसे हुए हैं और गुरु क्या करता है ? वे आगे कहती हैं :

**गुरु ने आतम रूप लखायो ।**

अभी हम भ्रम में फंसे हुए हैं, कर्मों के जाल में फंसे हुए हैं, हा इसी दुनिया को सच मान रहे हैं। गुरु हमें अंतर्मुख करके हमें सही रूप के दर्शन करा देता है।

सभी के अंदर प्रभू की सत्ता काम कर रही है। लेकिन वह जाग्रत अवस्था में नहीं है, वह सो रही है। जैसे Sleeping Beauty (सोई हुई राजकुमारी) को १०० साल बाद आकर सुंदर राजकुमार ने स्पर्श किया और वह उठ गई, वैसे ही हमारी आत्मा करोड़ों सालों से प्रभु से बिछुड़ी हुई है और जब कोई महापुरुष हम पर दया-मेहर करके हमारी अंतर की आँख और कान खोल देता है, तो हम अपने अंतर में प्रभु की ज्योति के दर्शन करते हैं और उसके शब्द को सुनना शुरू कर देते हैं। जिस रास्ते से हम प्रभु के घर से आते हैं, उसी रास्ते से हम प्रभु के घर वापिस चले जाते हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

## आज्ञा चक्र

'जागतिक अन्न और कृषि संगठन १९८८', रोम के निष्कर्ष अनुसार शाश्वत ग्राम विकास करने के लिए नैसर्गिक साधन-सामग्री का योग्य व्यवस्थापन करना अति आवश्यक है। मानव की मूल आवश्यकतायें जैसे अन्न, वस्त्र, निवास सहज प्राप्त हो इसके लिए मानव को सचेत रहना होगा ताकि आने वाली नई पीढ़ी भी सुख-शान्ति से रह सके। इसकी पूर्ति के लिए जमीन, जल, वनस्पति, पशु, पंछी एवं जैविक विविधता का योग्य संवर्धन शाश्वत खेती उत्पादन के लिए पर्यावरण को संतुलित रखना भी जरूरी है। इसलिए आर्थिक एवं सामाजिक दृष्टि से भी मान्य तन्त्रज्ञान विकसित करना पड़ेगा। खेती के अधिक उत्पादन के साथ किसने कैसे उत्पादित किया, यह बात भी स्वास्थ्य के लिए महत्वपूर्ण है। अत: अब समय की पुकार है अपने शाश्वत स्वरूप को पहचान कर यौगिक प्रक्रिया को समझकर और अपनाकर शाश्वत यौगिक खेती का प्रयोग व प्रसार करें, जिससे हम पुन: उस स्वर्णिम काल को प्रत्यक्ष रूप दे सकें।

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय के साथ उसकी सहयोगी संस्था राजयोग एज्यूकेशन ॲण्ड रिसर्च फाउण्डेशन के ग्राम विकास प्रभाग द्वारा पिछले दो वर्षों से भारत वर्ष के किसान भाई-बहिनों को 'शाश्वत यौगिका खेती' के विषय में जागृत किया जा रहा है। इस विद्यालय से संलग्न महाराष्ट्र तथा गुजरात के कई राजयोगी किसान भाई बहनों ने अपनी खेती पर राजयोग की शक्तियों का प्रयोग किया है, साथ-साथ जैविक खाद के नवीन नुस्खे तैयार करके अपनी खेती को बहुत अच्छा उपजाऊ बनाकर खेती कर रहे हैं, जिसके फलस्वरुप वे कम से कम खर्चे में बहुत अच्छी फसल ले रहे हैं। यह नये युग के लिए एक नया कदम है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक मुलगा पाय घसरून गाढवाच्या पायाजवळ पडतो.
बाजूने एक मुलगी जात असते.
मुलगी : काय रे, भावाच्या पाया पडतोयस का?
मुलगा : होय, वहिनी!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❉ भारतीय उद्योगाचे जनक?

– जमशेदजी टाटा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

**आहारसंभवं वस्तु रोगाश्चाहारसंभवाः ।**
**हिताहितविशेषाच्च विशेषः सुखदुःखयोः ।।**

चरक सूत्र २८|४५

## आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

सतत झिजणाऱ्या शरीराचे आहाराने पोषण करावे व चुकीच्या आहारसेवनाने होणाऱ्या व्याधींपासून शरीराचे रक्षण करावे, असे चरकाचार्यांनी सांगितले आहे.

आहारामुळे जसे शरीराचे पोषण होते, तसेच चुकीचा आहार घेतल्यानेच व्याधी निर्माण होतात.

उदाहरणार्थ : रक्तक्षय, मधुमेह, स्थौल्य, उच्च रक्तदाब, हृदयरोग अशा प्रकारच्या बऱ्याचशा व्याधी सदोष आहारानेच उत्पन्न होत असतात. वरील व्याधी उत्पन्न होण्यास इतर कारणे असतातच, परंतु त्याचबरोबर सदोष आहार घेणे हे तितकेच महत्त्वाचे कारण आहे. आहार प्रकृतीनुसार सम्यक व प्रमाणबद्ध असेल, तर शक्यतो व्याधी निर्माण होत नाहीत. प्रकृतीला हितकर आहाराने शरीरात सर्व धातू प्राकृत उत्पन्न होतात व त्यामुळे आरोग्य टिकून राहते. आधुनिक शास्त्रात आहार हा केवळ शरीराचे पोषण करण्यासाठी घ्यावयाचा असतो, असे सांगितले आहे. परंतु आयुर्वेदात आहाराने शरीराचेच नव्हे, तर त्यापासून मनाचेही पोषण होते, असे सांगितले आहे. म्हणूनच ज्या प्रकारचा आहार घेतो, त्याच प्रकारचे आपले मनदेखील घडते.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# रक्षाबंधन सणाचे महत्त्व

श्रावण पौर्णिमेला येणाऱ्या रक्षाबंधन या सणाच्या दिवशी बहीण आपल्या भावाचे औक्षण करून त्याला प्रेमाचे प्रतीक म्हणून राखी बांधते. भाऊ आपल्या बहिणीला ओवाळणी म्हणून भेटवस्तू देऊन तिला आशीर्वाद देतो. सहस्रो वर्षांपासून चालत आलेल्या रक्षाबंधन या सणामागील इतिहास, शास्त्र, राखी सिद्ध करण्याची पद्धत आणि या सणाचे महत्त्व सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून विशद केले आहे.




१. इतिहास – पाताळातल्या बळीराजाच्या हाताला लक्ष्मीने राखी बांधून त्याला आपला भाऊ केले व नारायणाची मुक्तता केली. तो दिवस श्रावण पौर्णिमेचा होता.

'बारा वर्षे इंद्र आणि दैत्य यांच्यात युद्ध चालले. आपली १२ वर्षे म्हणजे त्यांचे १२ दिवस. इंद्र थकून गेला होता आणि दैत्य वरचढ होत होते. इंद्र त्या युद्धातून स्वतःचे प्राण वाचवून पळून जाण्याच्या सिद्धतेत होता. इंद्राची ही व्यथा ऐकून इंद्राणी गुरुंना शरण गेली. गुरु बृहस्पति ध्यान लावून इंद्राणीला म्हणाले, 'जर तू आपल्या पातिव्रत्य बळाचा उपयोग करून हा संकल्प केलास की, माझे पतीदेव सुरक्षित रहावेत आणि इंद्राच्या उजव्या मनगटावर एक धागा बांधलास, तर इंद्र युद्ध जिंकेल.' इंद्र विजयी झाला आणि इंद्राणीचा संकल्प साकार झाला.

भविष्यपुराणात सांगितल्याप्रमाणे रक्षाबंधन हे मूळचे राजांसाठी होते. राखीची एक नवी पद्धत इतिहासकाळापासून सुरू झाली.

२. भावनिक महत्त्व – राखी बहिणीने भावाच्या हाताला बांधायची असते आणि त्यामागे भावाचा उत्कर्ष व्हावा व भावाने बहिणीचे संरक्षण करावे, ही भूमिका असते.

३. राखी बांधणे – तांदूळ, सोने आणि पांढऱ्या मोहऱ्या पुरचुंडीत एकत्र बांधल्याने रक्षा अर्थात राखी सिद्ध होते. ती रेशमी दोऱ्याने बांधली जाते.

येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः ।
तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ।।

अर्थ : महाबली आणि दानवेन्द्र असा जो बलीराजा जिने बद्ध झाला, त्या रक्षेने मी तुलाही बांधते. हे राखी, तू चलित होऊ नकोस.

तांदुळाच्या कणांचा समुच्चय राखी म्हणून रेशमी धाग्याने बांधण्याची पद्धत का आहे ? – 'तांदूळ हे सर्वसमावेशकतेचे प्रतीक, म्हणजेच ते सर्वांना आपल्यात सामावून घेणारे, तसेच ते सर्व लहरींचे उत्तम आदान–प्रदान करणारे आहे. तांदुळाचा समुच्चय पांढऱ्या वसनात बांधून तो रेशमाच्या धाग्याने शिवरूपी जिवाच्या उजव्या हातात बांधणे, म्हणजे एक प्रकारे सात्त्विक रेशमी बंधन सिद्ध करणे. रेशमी धागा सात्त्विक लहरींचे गतीमान वहन करण्यात अग्रेसर आहे.

४. बहिणीने भावाला राखी बांधतांना कसा भाव ठेवावा ? – श्रीकृष्णाच्या बोटातून वाहणाऱ्या रक्तप्रवाहाला थांबवण्यासाठी द्रौपदीने तिच्या साडीचा पदर फाडून त्याच्या बोटाला बांधला. बहीण भावाला होणारा त्रास कदापी सहन करू शकत नाही. त्याच्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी ती काहीही करू शकते. राखी पौर्णिमेच्या दिवशी प्रत्येक बहिणीने भावाला राखी बांधतांना हाच भाव ठेवला पाहिजे.

५. भावाने सात्त्विक ओवाळणी देण्याचे महत्त्व – असात्त्विक भेटवस्तू रज–तमप्रधान असते म्हणून भावाने बहिणीला सात्त्विक भेटवस्तू द्यावी. सात्त्विक भेटवस्तू अर्थात कोणताही धार्मिक ग्रंथ, जपमाळ अशा वस्तु ज्यामुळे बहिणीला साधना करण्यात साहाय्यता होईल.

६. प्रार्थना करणे – बहिणीने भावाच्या कल्याणासाठी व भावाने बहिणीच्या रक्षणासाठी प्रार्थना करण्याबरोबरच दोघांनीही 'राष्ट्र व धर्म यांच्या रक्षणासाठी आमच्याकडून प्रयत्न होऊ देत', अशी ईश्वराला प्रार्थना करावी.

७. राखीच्या माध्यमातून होणारे देवतांचे विडंबन रोखा ! – हल्ली राखीवर 'ॐ' किंवा देवतांची चित्रे असतात. राखीच्या वापरानंतर ती इतस्ततः पडल्यामुळे एकप्रकारे देवता व धर्मप्रतीक यांचे विडंबन होते. हे टाळण्यासाठी राखीचे पाण्यात विसर्जन करा !

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

# बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सण : राखी पौर्णिमा

आज श्रावण पौर्णिमा आजचा दिवस संपूर्ण देशात राखी पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. राखी पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. बहीण भावाच्या पवित्र नात्याला बंधनात बांधणारा हा सण. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ देखील आपल्या लाडक्या बहिणीला तिच्या आवडीची भेट देऊन तिला तिच्या सुरक्षेची हमी देतो त्यामुळे या सणाची बहीण भाऊ दोघेही आतुरतेने वाट पाहत असतात. विशेषतः जे बहीण भाऊ एकमेकांपासून लांब असतात त्यांना या निमित्ताने एकमेकांची भेट घेता येते. आपली सुख दुःख एकमेकांना सांगता येतात आणि जुन्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळतो. राखी पौर्णिमा या सणाला पौराणिक इतिहास आहे. पुरातन काळात जेंव्हा स्त्री स्वतःला असुरक्षित मानत होती तेंव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे जो तिची रक्षा करील.

इंद्राच्या राणीने आपल्या मनगटावर एक धागा बांधला होता. ज्याच्या समर्थ्याने वज्रासुर राक्षसाचा पराभव केला तेव्हापासून त्याची स्मृती म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत सुरू झाली असे मानले जाते. तसेच ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमायून बादशहाला राखी पाठवली व हुमायून बादशहाने देखिल आपल्या या बहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले.

राखी पौर्णिमेचे असे अनेक दाखले पुराणात आणि इतिहासात पाहायला मिळतात. राखी पौर्णिमेला रक्षा बंधन असेही म्हणतात. राखी बांधण्याचा अर्थ आपण त्या व्यक्तीच्या बंधनात स्वतःला वाहून घेऊन तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. राखी पौर्णिमेच्या दिवशी राखीचा धागा बांधून भाऊ बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो म्हणूनच या सणाला रक्षा बंधन असेही म्हणतात. रक्षा करणे जबाबदारी स्वीकारणे. या दिवशी भाऊ आपल्या बहिणीची जबाबदारी स्विकारतो. वडीलांच्या पश्चात भाऊ आपल्या बहिणीची सर्व परिस्थितीत जबाबदारी स्वीकारतो तर आईच्या पश्चात भावास आईचे निरपेक्ष प्रेम देणे, काळजी घेणे याची जबाबदारी बहीण स्वीकारते म्हणून याला रक्षा बंधन असे म्हणतात. या दिवशी बहीण आणि भाऊ एका पवित्र बंधनात बांधले जातात म्हणून या सणाला बहीण भावाच्या पवित्र नात्याच्या सण असे म्हटले जाते. राखी बंधनाच्या या पवित्र सणातून मित्रत्व, स्नेह व परस्पर प्रेम वृद्धिंगत होते. आपल्या संस्कृतीत स्त्रीला देवी मानले जाते. अशी ही देवतुल्य स्त्री म्हणजे बहीण आपल्या भावाला राखी बांधण्यापूर्वी त्याच्या कपाळावर टिळा लावते. हा टिळा फक्त मस्तकाच्या आदरचा नसून भावाच्या मस्तकातील सदविचार व सदबुद्धि जागृत राहण्यासाठीची ही पूजा असते. राखीचा धागा हा नुसताच सुताचा धागा नसून ते शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुरुषार्थाचे बंधन आहे. ह्या एव्हढ्याशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो व मन प्रफुल्लित होतो. एकमेकांना जोडणारा हा सण सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवणारा आहे. रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे नाती जोडण्यास ह्या सणामुळे समाजास वाव मिळतो. ज्याला सख्खी बहीण नाही किंवा जिला सख्खा भाऊ नाही ती बहीण मानस भावाला राखी बांधते आणि बहीण भावाचे पवित्र नाते वृद्धिंगत करते असा हा बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सणाच्या सर्व भारतीयांना शुभेच्छा!

# महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी ॲड. शेख हाफिज एन. जहागीरदार



नगर – महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनचे अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी नोटरी पब्लीक ॲड. शेख हाफिज एन. जहागीरदार यांची नुक्तीच महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. सय्यद सिकंदर अली, कार्याध्यक्ष ॲड. यशवंतराव खराडे, ॲड. प्रविण एच नलावडे यांनी निवड केली असून तसे पत्र दिले आहे.

भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांचे विधी व न्याय विभागा मार्फत नोटरी कायदा १९५६ मधील कलम ४ (१) प्रमाणे वकिलांमधून नोटरी यांची नियुक्ती केलेली आहे. महाराष्ट्रात अनेक नोटरी कार्यरत असून वेगवेळ्या शासकीय कार्यालयात लागणारे प्रतिज्ञानापत्रे, करारनामे, अधिकारपत्र, मृत्युपत्र भाषांतर, सांक्षकण तसेच न्यायालयात दाखल करावयाचे प्रतिज्ञापत्रे करण्याचे काम नोटरी करतात सदर कामे करताना नोटरी यांना त्यांचा परवाना नुतनिकरण, शासकिय स्तरावर व पोलिसात दाखल होणारे गुन्हे व इतर अडचणीचे निवारण करणे करीता महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनची सुमारे २२ वर्षापुर्वी स्थापना झालेली आहे.

ॲड. शेख हाफिज जहागीरदार हे सन १९९६ पासून जिल्हा न्यायालयात वकिल व्यवसाय करीत आहे. सन २००७ मध्ये भारत सरकारचे विधि व न्याय विभागाने त्यांची नोटरी पब्लीक म्हणून नियुक्ती केलेली आहे. ॲड. हाफिज जहागीरदार यांनी विद्यार्थीदशेपासून विद्यार्थी संघटना एन. एस. यु.आय चे शहर उपाध्यक्ष, विद्यार्थी कृती समितीचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. तसेच विधी व्यवसाय करीत असताना अहमदनगर शहर वकील संघटनेचे सचिव व लॉयर्स को–ऑप सोसायटीचे व्हा. चेअरमन म्हणून पद भुषविलेले आहे.

सध्या लॉयर्स को–ऑप सोसायटी संचालक, अमन व इन्साफ फौंडेशनचे सचिव व हजरत पिर सरकार शाहा शरीफ दर्गाचे विश्वस्त म्हणून काम पाहत आहे. ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्टचे मागणी करीता झालेल्या आंदोलनात देखील त्यांचा सक्रिय सहभाग होता.

# उल्हास दुगड यांचा 'आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने' गौरव

नगर – अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास पोपट दुगड यांना जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने गौरविण्यात आले.

अशोकभाऊ फिरोदिया स्कूलच्या सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात शिक्षण विस्तार अधिकारी अभयकुमार वाव्हळ, गणित अध्यापक महामंडळाचे सल्लागार जनार्दन मुंढे, मच्छिंद्र वीर व गणित अध्यापक महामंडळाचे राज्य अध्यक्ष संजय निक्रड यांच्या हस्ते मुख्याध्यापक दुगड यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, जिल्हा गणित मंडळाचे अध्यक्ष नवनाथ घुले, माध्यमिक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे, कल्याण ठोंबरे आदींसह जिल्ह्यातील शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते.



अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास पोपट दुगड यांना जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने गौरविण्यात आले.

उल्हास दुगड हे २०१५ पासून भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी सांभाळत आहे. त्यांनी विविध उपक्रमाद्वारे शाळेतील कला, क्रीडा व शैक्षणिक उपक्रमाला चालना देण्याचे काम केले आहे. विविध क्षेत्रात शाळेचे गुणवंत विद्यार्थी चमकत आहे. सातत्याने गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे कार्य सुरू असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कला, क्रीडा व शैक्षणिक स्पर्धा परीक्षांमध्ये अनेक विद्यार्थी चमकले आहेत. तर जिल्ह्यात उज्वल निकालाची परंपरा त्यांनी कायम राखलेली आहे. या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

तसेच दुगड हे उत्कृष्ट खेळाडू असून त्यांनी राज्य राष्ट्रीय क्रीडा प्रकारात एकूण २९ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कास्य पदके पटकाविले आहेत. २००६ मध्ये मलेशिया येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते. यापूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाचा जिल्हा क्रीडा पुरस्कार, राज्यशिक्षक पुरस्कार व पॅरोलेम्पिक संघटनेचा साफल्य हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे.

जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, तसेच उपमुख्याध्यापक कैलास साबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, कल्पना पाठक, वैभव कुलकर्णी व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त शोभायात्रेचे आयोजन

### जिव्हेश्वर पालखीचे उत्साहात स्वागत

नगर – बागडपट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर येथून भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव निमित्त अहिल्यानगर शहरातून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.या शोभायात्रेच्या अग्रभागी भगवान श्री जिव्हेश्वर यांची पालखी, सनई चौघडा, उंट, घोडे, बाल वारकरी, महिला भजनी मंडळ, भगवान श्री जिव्हेश्वर यांची प्रतिमा असलेला रथ हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले होते.



भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवा निमित्त आयोजित शोभायात्रेत आमदार संग्राम जगताप यांनी भगवान श्री पालखीचे दर्शन घेतले. या शोभायात्रेत स्वकुळसाळी समाज बांधव भगिनी उपस्थित होते.

या मिरवणुकीत स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, कार्य.अध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे, खजिनदार गजेंद्र सोनवणे, सचिव विजय मानकर, विश्वस्त संजय सागांवकर, जितेंद्र लांडगे, सचिन मडके, संदीप पाठक, बाबासाहेब वैद्य, प्रविण झिंजे, उत्सव समितीचे राकेश गवते, योगेश भागवत, चंद्रकांत मानकर, सुनिल पावले, प्रविण जुंदरे, सुरेश इंगळे, निरज चांगटे, नरेश कांबळे, संजय दळवी, काशिनाथ पाठक, अविनाश पावले, प्रदिप दळवी, महेश कांबळे, योगेश पांढरपोटे, श्रीमती छाया साळी, सौ.वनिता पाटेकर, सुरेखा शेकटकर, सौ.मनीषा पाठक, सौ. स्नेहा पाठक, सौ. आरती लांडगे, सौ.शितल सागांवकर, जया वैद्य, सौ. रागिणी ओहळ, सौ.वनिता मानकर, श्रीमती ऊज्वला वाघमारे, सौ. जयश्री कोदे, सौ. शुभदा वल्ली, सोमनाथ खाडे, प्रताप मारवाडे, प्रदिप व्हावळ, ॲड.समीर वखारे, उल्हास ढोरे, सुरेंद्र सोनवणे आदींसह समाज बांधव व भगिनी उपस्थित होते.

भगवान श्री जिव्हेश्वर पालखीचे स्वागत आमदार संग्राम जगताप, दीपक सुळ, धनंजय जाधव, गणेश कवडे, मनोज कोतकर, सचिन जाधव, बाबासाहेब वाकळे, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, सुनील रामदासी, बाळासाहेब भुजबळ, मयूर बोचुघोळ, रवी दंडी आदींनी स्वागत केले. या मिरवणुकीची मार्ग बागडपट्टी, नेता सुभाष चौक, चितळे रोड, रंगार गल्ली, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट वेस, तोफखाना, बागडपट्टी येथे या मिरवणुकीच्या समारोप करण्यात आला.



श्री लक्ष्मीनारायण मंदिरात भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात साजरा

नगर – बागडपट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरात भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात सौ. रिधिमा व गणेश लांडगे यांच्या हस्ते महाअभिषेकाने झाली. त्यानंतर कृष्णा बागडे यांनी जिव्हेश्वर ग्रंथाचे वाचन केले. पालखी पूजन सौ. मनीषा पाठक व संदीप पाठक यांनी केले, तर महाआरती आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडली.

या कार्यक्रमाला दीपक सुळ, धनंजय जाधव, गणेश कवडे, बाळासाहेब भुजबळ, संजय झिंजे, बाबासाहेब सानप, मुकुल गंधे, बाली बांगरे, काशिनाथ मोटे, हरिभाऊ डोळसे, सुरज जाधव, स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, कार्यकारिणी अध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे, खजिनदार गजेंद्र सोनवणे, विजय मानकर, विश्वस्त संजय सागांवकर, जितेंद्र लांडगे, सचिन मडके, बाबासाहेब वैद्य, गणेश झिंजे, अभिजीत अष्टेकर, उत्सव समितीचे राकेश गवते, योगेश भागवत, चंद्रकांत मानकर, कार्यकारिणी सदस्य सुनिल पावले, प्रविण जुंदरे, सुरेश इंगळे, किशोर विंचुरकर, किरण डफळ, निरज चांगटे, प्रदिप दळवी, महेश कांबळे, योगेश पांढरपोटे, श्रीमती छाया साळी, सौ.वनिता पाटेकर, सल्लागार कृष्णा बागडे, सोमनाथ खाडे, प्रताप मारवाडे, प्रदिप व्हावळ, ॲड.समीर वखारे, उल्हास ढोरे, सुरेंद्र सोनवणे उपस्थित होते.



कचरा वेचकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अहिल्यानगर महापालिकेत या योजनेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

# कचरा वेचकांच्या सन्मानासाठी महापालिकेत नमस्ते योजनेचा शुभारंभ

नगर – केंद्र सरकारच्या नमस्ते योजना अंतर्गत कचरा वेचकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अहिल्यानगर महापालिकेत या योजनेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. कागद, काच पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित बैठकीत उपायुक्त संतोष टेंगळे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी महापालिकेचे घनकचरा व्यवस्थापक अशोक साबळे, पुणे येथील कष्टकरी पंचायतच्या वैशाली उषा अशोक, स्वाती पाटील, कविता मैत्री, चंचल कोष्टी, तसेच अहिल्यानगर जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे उपस्थित होते. कचरा वेचक प्रतिनिधी लंकाबाई शिंदे, कमल खुडे, विठाबाई साबळे, नंदाबाई सोनवणे व रामवाडी तसेच शहरातील कचरा वेचक महिला उपस्थित होत्या.

वैशाली अशोक म्हणाल्या की, केंद्र सरकारच्या नमस्ते योजनेतून कचरा वेचकांची अधिकृत नोंदणी केली जाणार आहे. या नोंदणीद्वारे त्यांना ओळखपत्र मिळणार असून, त्यांच्या कामाला अधिकृत मान्यता मिळणार आहे. नोंदणीकृत कचरा वेचकांना आयुष्मान भारत आरोग्य विमा योजनेचा लाभ, त्यांच्या इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांना ३,५०० रुपयांची शिष्यवृत्ती, तसेच त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक किट्स मिळणार आहेत. त्यानुसार सर्व कचरा वेचकांनी तातडीने नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

विकास उडाणशिवे यांनी कचरावेचकांच्या अत्यंत कठीण जीवनस्थितीवर प्रकाश टाकताना सांगितले की, कचरावेचकांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. महागाईच्या काळात कचरा वेचून मिळणारी रक्कम अतिशय तटपुंजी आहे. कचरा वेचक समाजात स्वच्छतेसाठी मोठा हातभार लावत आहे. त्यांच्या कामाची पत वाढली पाहिजे. त्यांना जीवन जगण्या योग्य किंमत मिळाली पाहिजे. या दृष्टिकोनातून शासनाने एक वेगळी योजना राबवण्याची गरज आहे. मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजा भागवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना त्यांना करावा लागत आहे. नमस्ते योजनेच्या माध्यमातून कचरा वेचकांच्या मुलांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमुळे मोठा आधार झाला आहे. आरोग्याबद्दल देखील सहकार्य मिळाले असल्याची भावना व्यक्त केली.

उपायुक्त संतोष टेंगळे यांनी कचरा वेचक हे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी योगदान देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन केंद्र शासनाने नमस्ते योजनाच्या माध्यमातून त्यांना शासकीय योजनांच्या प्रवाहात आणले आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब असून, याचा कचरा वेचकांनी लाभ घेण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# एकल महिलांचे सर्वेक्षण महिन्यात पूर्ण करा

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आदेश

नगर – जिल्ह्यातील एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमास गती देण्यासाठी महापालिका क्षेत्रातील एकल महिलांचे सर्वेक्षण एक महिन्यात पूर्ण करा, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास समितीची राजस्व सभागृहात आयोजित बैठक.

जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास समितीची बैठक राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी डॉ.आशिया बोलत होते.

या बैठकीस महापालिका आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा नियोजन अधिकारी दिपक दातीर, कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख, कौशल्य व रोजगार विभागाचे सहा. आयुक्त रविकुमार पंतम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, महिला व बाल विकास विभागाचे कार्यक्रम अधिकारी महादेव जायभाय, सहा.कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले, जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक शाम बिरादर, जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी बी.आर.मुंढे, कौशल्य विकास अधिकारी श्रीमती शुभदा पाठक, एम.आय.डी.सी.चे दिलीप काकडे, उमेदचे सोमनाथ जगताप, आय.टी. आय. प्राचार्य के.ऐ.जहागिरदार, एन.यु.एल.एम.च्या सुप्रिया घोगरे, शासकीय तंत्रनिकेतनचे वाय.एम. दांदळे, जनशिक्षणचे शफाअत सय्यद, एम.सी.ई.डी.चे रमेश जाधव, सी.वाय.डि.ए.चे मोहन कांडेकर, प्रथमचे दिवाकर भोयर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, शहरी व ग्रामीण भागातील एकल महिलांचा कल आणि आवड लक्षात घेऊन त्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित यंत्रणांनी महिलांच्या गटांमध्ये जागरूकता निर्माण करावी आणि प्रशिक्षण निश्चित करावे.

जिल्हा कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख म्हणाले, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात एकल महिलांच्या सक्षमीकरणाचे महत्वकांक्षी काम हाती घेण्यात आले आहे. या कामाची केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कौशल्य विकास विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी माहिती घेतली असून या कामाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे या संदर्भात काम करीत असलेल्या प्रत्येक घटकाची जबाबदारी वाढली आहे.

प्रारंभी जिल्हा कौशल्य व रोजगार विभागाचे सहाय्यक आयुक्त रवीकुमार पंत यांनी मागील बैठकीतील निर्णयांच्या पूर्ततेबाबतचा अहवाल सादर केला. त्याचप्रमाणे एकल महिलांना उपयुक्त ठरतील अशा काही ट्रेडचा जिल्हा नियोजन आराखड्यात समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला. समितीने हा प्रस्ताव एकमताने स्विकारला.

यावेळी जिल्हा उद्योग केंद्र व एम.सी.ई.डी. यांच्या वतीने महिलांसाठी प्रशिक्षणाबाबत जनजागरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच प्रथम या संस्थेने वयोवृद्ध एकल महिलांच्या मुलांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची तयारी दर्शविली.

अहिल्यानगर जिल्ह्यात हाती घेण्यात आलेल्या एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमात पात्र महिलांनी सहभागी होऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले.

# विश्वास, सेवा आणि समाजासाठी बांधिलकी जपणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल हे रुग्णांसाठी आरोग्य मंदिरच

**डॉ.सौ.सुधा कांकरिया यांचे प्रतिपादन**



जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आयोजित कान,नाक, घसा शिबीराचे उद्घाटन डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधा कांकरिया यांच्या हस्ते झाले.

नगर – आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या उदात्त शिकवणुकीतून प्रेरित होऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलने गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्यसेवेचे एक पवित्र कार्य आपल्या खांद्यावर घेतले आहे. हे केवळ एक हॉस्पिटल नसून एक आरोग्य मंदिर आहे, जिथे प्रत्येक रुग्णाला केवळ उपचारच नव्हे, तर मानसिक समाधान आणि आत्मविश्वास मिळतो. येथे पाऊल टाकणारा प्रत्येक रुग्ण हा बरा होऊन, आनंदी मनाने आणि समाधानाच्या भावनेने घरी परततो. सेवा, संवेदनशीलता आणि समर्पण या तीन स्तंभांवर उभारलेले हे आरोग्य मंदिर खऱ्या अर्थाने समाजासाठी आशीर्वादच आहे. या हॉस्पिटलची आणखी एक खासियत म्हणजे भारतातील नामांकित आणि अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर येथे आपली सेवा देतात. रुग्णांच्या आजाराचे सखोल निदान करून, योग्य मार्गदर्शन, औषधोपचार आणि आवश्यक तेव्हा अत्याधुनिक शस्त्रक्रिया करण्यात येते. यामुळे रुग्णांमध्ये या हॉस्पिटलविषयीचा विश्वास अधिकाधिक दृढ होत गेला आहे. हा विश्वास, ही सेवा भावना आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा – हेच आनंदऋषीजी हॉस्पिटलचे खरे वैशिष्ट्य असून, हे कार्य नक्कीच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन डॉ.सौ.सुधा कांकरिया यांनी केले.

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आयोजित कान, नाक, घसा शिबीराचे उद्घाटन डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधा कांकरिया यांच्या हस्ते झाले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष सुभाष गर्जे, सचिव संदिप ठोंबे, उद्योजक सुभाष संचेती (बीड), सुनिल मालु, संतोष बोथरा, सतिष लोढा, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ.अशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, तज्ञ डॉ.सुकेशीनी गाडेकर, डॉ.अतुल तुपे, डॉ.अझर शेख, डॉ.सुरज कर्डिले आदि उपस्थित होते.

याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष सुभाष गर्जे, म्हणाले की, आरोग्यसेवेच्या क्षेत्रात आनंदऋषीजी हॉस्पिटलने उभारलेला आदर्श हा आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या विचारांचा आधार घेत, या जैन सोशल फेडरेशनने समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने आणि सहानुभूतीने उपचार देण्याचा वसा जपला आहे. रुग्ण जेव्हा इथे येतो, तेव्हा तो केवळ आजारातून मुक्त होण्यासाठी येत नाही, तर तो आपुलकीच्या आणि विश्वासाच्या वातावरणात नवी उभारी घेण्यासाठी येतो. हेच या ठिकाणाचे वैशिष्ट्य आहे. समाजहिताचा ध्यास घेऊन कार्य करणार्या अशा संस्थांना रोटरी क्लब सदैव साथ देत राहील. असे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले तर प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले. या शिबीरात कान, नाक, घसा १११ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी आलेल्या मान्यवरांचा सन्मान डॉ.सौ. सुधा कांकरिया व डॉ.प्रकाश कांकरिया यांच्या हस्ते हृदय आरोग्याच्या गप्पा गोष्टी हे पुस्तक देवुन करण्यात आला.

# भारतीय जैन संघटनेच्यावतीने नगरमध्ये १७ ऑगस्ट रोजी 'परिणय पथ कार्यक्रम'

**समाजातील विवाह इच्छुक तरूणतरूणींसाठी सुवर्ण संधी : संस्थापक शांतीलाल मुथा**



नगर – भारतीय जैन संघटनेने जैन समाजातील सुशिक्षित तरूण–तरूणींना योग्य जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देणारा 'परिणय पथ' हा नवा उपक्रम हाती घेतला आहे. टेक्नोसॅव्ही असलेल्या नव्या पिढीच्या बदलत्या विवाह संकल्पनांचा सखोल अभ्यास करून हा अभिनव उपक्रम समाजासमोर सादर केला आहे. विवाह इच्धूक तरूण–तरूणींची एकमेकांसोबत प्रत्यक्ष भेट, थेट संवाद आणि जोडीदार निवडण्यासाठी मार्गदर्शन असे याचे स्वरूप आहे. 'परिणय पथ'चा हा दुसरा कार्यक्रम १७ ऑगस्टला एलिट बँक्वेट हॉल, हॉटेल संकेत मागे, अहिल्यानगर येथे होणार आहे. यात २२ ते २६ वर्षे वयोगटातील मुली, तर २४ ते २८ वर्षे वयोगटातील मुले तसेच ग्रॅज्युएट व प्रोफेशनल डिग्रीधारक तरूण–तरूणी सहभागी होऊ शकतात.

आजच्या तरूणाईचा विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अपेक्षा व प्राधान्यक्रम पूर्णत: वेगळा आहे. सुसंगतता, समाजपातळी, अपेक्षा, जीवनशैली, राहणीमान, एकमेकांचे विचार बीजेएसने या बदलांचा गांभीर्याने अभ्यास करून विवाहपूर्व सुसंवाद, मुल्याधिष्ठित संवाद आणि वास्तववादी निवडीस प्रोत्साहन देणारा हा उपक्रम आखला आहे. विशेष म्हणजे तरूण तरूणींच्या सत्रानंतर सायंकाळी पालकांसाठी स्वतंत्र सत्र, निवडलेल्यांच्या कुटूंबीयांचा थेट संवाद तसेच पुढे प्रत्येक जिल्ह्यातील ४ अनुभवी समन्वयकांकडून लग्न नक्की होईपर्यंत मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

याविषयी संस्थापक शांतिलाल मुथ्था म्हणाले, जैन समाजासाठी विशेषत: तरूणाईसाठी ते अतिशय चांगले व्यासपीठ आहे. यात फक्त लग्न जमविण्याची प्रक्रिया नसून जमलेले लग्न चिरकाळ टिकेल अशा प्रकारची प्रक्रिया निर्माण करण्यात आलेली आहे. जैन समाजासाठी ही सुवर्णसंधी असून समाजाने या बदलात सहभागी व्हावे.

या मेळाव्यात फक्त २० तरूण–तरूणींना प्रवेश देण्यात येणार असून इच्छूकांनी त्वरित नाव नोंदणी करावी. तसेच माहितीसाठी भारतीय जैन संघटना मुख्य कार्यालय, ९१५८८७०१९ या क्रमांकावर संपर्क साधावा,' असे आवाहन आदेश चंगेडिया (बीजेएस–राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य, मो. ९०१११५५५५५), प्रशांत गांधी (बीजेएस–अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष), प्रीतम राका (बीजेएस–अहिल्यानगर महिला जिल्हाध्यक्ष), प्रियंका चंगेडिया (बीजेएस–अहिल्यानगर महिला उपजिल्हाध्यक्ष) यांनी केले आहे.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला सर्वोत्कृष्ट क्लबचा गोल्डन पुरस्कार व नितीन थाडे यांना सर्वोत्कृष्ट अध्यक्षाचा रोटरी प्लॅटिनम पुरस्कार प्रदान




रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला सर्वोत्कृष्ट क्लबचा गोल्डन पुरस्कार व नितीन थाडे यांना सर्वोत्कृष्ट अध्यक्षाचा रोटरी प्लॅटिनम पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – रोटरी इंटरनॅशनल ही जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था (NGO) असून संस्थेचे समाजकार्य संपूर्ण जगात ४६००० संलग्न क्लबच्या मदतीने चालते. रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचा समावेश असून डिस्ट्रिक्ट मधील १०५ क्लबमधून रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला रोटरी वर्षे २०२४–२५ करिता सर्वोत्कृष्ट क्लबच्या डायमंड पुरस्कार व क्लबचे अध्यक्ष रो. नितीन थाडे यांना सर्वोत्कृष्ट अध्यक्षाचा प्रतिष्ठेच्या प्लॅटिनम पुरस्काराने गौरवण्यात आले. रो. नितीन थाडे यांच्या अध्यक्षपदाच्या रोटरी वर्षात क्लबने अनेक सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय उपक्रम राबविले. त्यापैकी एकाच रोटरी वर्षात पाच रोटरी क्लब स्थापन करणारे रोटरी परिवारातील ते एकमेव अध्यक्ष आहेत. त्यांनी नगर जिल्ह्यातील जामखेड सिटी, नेवासा फाटा, सुपा व नगर शहरात केडगाव टाऊन व वडगाव गुप्ता येथे नव्याने रोटरी क्लबची सुरुवात केली. सदर कार्यासाठी रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला प्रमोशन ऑफ न्यु एक्टेशन क्लब तसेच बेस्ट मेंबरशीप डेव्हलपमेंट डायमंड अवार्ड व ट्रॉफीने सन्मानित करण्यात आले. रो. नितीन थाडे यांनी क्लबला व स्वतःला मिळालेल्या पुरस्काराचे सर्व श्रेय क्लबचे सचिव रो. सुभाष गर्जे तसेच संचालक मंडळाला दिले. सेव्ह गर्ल चाइल्ड (बेटी बचाव) व प्रमोटिंग पीस या उपक्रमास डायमंड पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी डॉ. सुधा कांकरीया यांचे विशेष कौतुक केले.

त्यांच्या कार्यकाळात रोटरी युथ एक्सचेंज अंतर्गत अनन्या वैकर हिने अमेरिकेमध्ये एक वर्षाचे इंटर्नशिप पूर्ण केली आहे. त्याचप्रमाणे क्लबचे सदस्य रो. दादासाहेब करंजुले यांना बेस्ट डिस्ट्रिक्ट ऑफिसर प्लॅटिनम पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच बेस्ट एजी झोन सी डायमंड पुरस्काराने रो. पुरुषोत्तम जाधव यांना गौरवण्यात आले. त्याचप्रमाणे रोटरी क्लब ऑफ अहमदनगर ला बेस्ट डायमंड इंटरॅक्ट ट्रॉफी, व युथ सर्विस अप्रिसिएशन ट्रॉफीने गौरवण्यात आले. तसेच क्लब ने सामाजिक, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, कम्युनिटी सर्विस आणि पोलिओ निर्मूलन क्षेत्रात केलेल्या भरीव योगदानाबद्दल डीजी सायटेशन ने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा जालना येथे झालेल्या विजयोत्सव समारंभात जल्लोषपूर्ण वातावरणात रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो. डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते झाला. सदर कार्यक्रमास रोटरीचे अकरा जिल्ह्यातील सदस्य उपस्थित होते. रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचे संचालक व सदस्य तसेच सचिव रो. सुभाष गर्जे, रो. राजेश उपाध्ये, चंदा उपाध्ये, रो. माधव देशमुख, रो. साधना देशमुख, विद्यमान पब्लिक इमेज डायरेक्टर रो. निलेश वैकर व रो. भावना वैकर, अनन्या वैकर, रो. डॉ. प्रकाश कांकरीया व रो. डॉ. सुधा कांकरिया, रो. दिलीप कर्नावट, रो. सुनिता कर्नावट, उपप्रांतपाल रो. पुरुषोत्तम जाधव, रो. अजित जगताप, रो. कौशिक कोठारी, रो. प्रशांत बोगावत, रो. संदीप ठोंबे, रो. विनोद जागीरदार, रो. शोभा ठोंबे, रो. रविंद्र राऊत व रो. अनघा राऊत, उपप्रांतपाल प्रसन्न खाजगीवाले उपस्थित होते. त्याचप्रमाणे रोटरी क्लब ऑफ अहमदनगर ला वर्षभरात सहकार्य करणारे स्नेहालयाचे डॉ. गिरीश कुलकर्णी, डीजीएन रो. क्षितीज झावरे, पीडीजी रो. प्रमोद पारिख, पीडीजी शिरीष रायते, अनामप्रेम अध्यक्ष अजित माने, स्नेहालय महिला बालकल्याण संस्थेचे हनीफ शेख, उडान संस्थेचे प्रवीण कदम, जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. विकास मढीकर, जिल्हा रुग्णालयाचे डॉ. हर्षल पठारे, सायकलिंग असो. चंद्रशेखर मुळे, इम्प्रेस बायकर्स च्या नेहा जग्गी, ट्रैकॅम्पचे विशाल लाहोटी, विखे पाटील मेडिकल फाउंडेशनचे एम. एस. डॉ. सतिश मोरे, निलेश काळे, तसेच कॅन्सर तज्ञ रो. डॉ. प्रकाश गरुड, अवतार मेहेर बाबा केंद्राचे मेहेरनाथ कालचुरी, रेडिओ नगरचे भूषण देशमुख, इंडो आयरिश हॉस्पिटल, बुथ हॉस्पिटल अधिका–यांचे विशेष आभार मानले. नगर शहरात आठ रोटरी क्लब असून त्यापैकी १८ ऑगस्ट १९४७ रोजी स्थापन झालेल्या रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला ७८ वर्षांची समाजसेवेची गौरवशाली परंपरा आहे.

# थॅलेसिमीया रुग्णाच्या उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात नविन युनिट उघडण्यासाठी प्रयत्न करणार

**शालिनीताई विखे पाटील यांचे प्रतिपादन**



जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई यांना थॅलेसिमीया या आजारावर उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात नवीन युनिट सुरु करणे बाबत निवेदन सादर करताना ॲड. नदिम सय्यद व रफिक मुन्शी.

नगर – थॅलेसिमीया या दुर्धर आजारासाठी मुंबई आणि पुणे येथे रुग्णांना उपचारा करीता जावे लागते. त्याबाबत उपचाराकरीता साधारणत: खर्च २० ते २५ लाखापर्यंत येत असतो त्यामध्ये प्रामुख्याने बोन मॅरो शस्त्रक्रिया रक्तपूरवठा रुग्णास करणे, विविध औषधांचा पुरवठा आणि तज्ञ वैद्यकिय क्षेत्रातील अधिकारी यांचे मार्गदर्शन हवे असते. त्याकरीता नव्याने रुग्णांच्या सोयीसुविधांकरीता नगर येथील शासकीय रुग्णालयातच उपचाराकरीता अत्याधुनिक युनिट सुरु करण्याचे प्रयत्न करण्यात येतील असे शालिनीताई विखे पाटील यांनी सांगितले. त्याबाबतचा विषय जिल्हा नियोजन समितीमध्ये चर्चेसाठी ठेवण्यात येऊन आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात येईल.

थॅलेसिमीया रुग्णांच्या उपचाराकरीता आपल्या जिल्ह्यातच सुविधा व्हाव्यात म्हणून आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांना नव्याने युनिट बाबत आराखडा तयार करण्यास सांगितले होते. त्या अनुसार जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आराखडा तयार करुन सादर केलेला आहे. त्याबाबतचा विषय जिल्हा नियोजन समितीत ठेवण्याकरीता आमदार शिवाजीराव कर्डीले यांनी पालकमंत्र्यांकडे सादर केलेला आहे.

ॲड. नदिम सय्यद यांनी थॅलेसिमीया या विषयावर 'असही जगणं असतं' हे पुस्तक लिहिलेले आहे. त्या पुस्तकामध्ये स्वतःच्या मुलाच्या आजारा बद्दल उपचार पद्धतीवर होणारा खर्च इ. बाबत सखोल माहिती दिलेली आहे. त्याबाबत त्यांनी संकल्पना मांडली की, या आजाराकरीता रुग्णास बराच खर्च येत असल्यामुळे नगरच्याच शासकीय रुग्णालयात याबाबत उपचाराकरीता युनिट होणे आवश्यक आहे. त्याबाबत शालिनीताई विखे पाटील यांनी तात्काळ दुरध्वनीवरुन अधिकारी वर्गास सदरचा विषय जिल्हा नियोजन समितीमध्ये ठेवण्यासाठी सुचित केले. नविन युनिट सुरु करण्याकरीता ॲड. सय्यद नदिम आणि माजी विशेष समाज कल्याण अधिकारी हे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.



**बी के उषा दीदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बांधली राखी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस श्रीक्षेत्र देवगांव शनि येथे 'अखंड हरिनाम सप्ताह'दरम्यान १४३ देशांमध्ये ध्यानधारणेचे प्रशिक्षण देत असलेल्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सोनई सेवाकेंद्राच्या संचालीका बी के उषा दीदी यांनी राखी बांधली. यावेळी बी के १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ध्यानधारणा प्रशिक्षक डॉ. दीपक हरके उपस्थित होते.

# हर घर तिरंगा अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज

नगर – स्वातंत्र्य दिनानिमित्त संपूर्ण राज्यात हर घर तिरंगा अभियान राबविण्याबाबत शासनाने निर्देश दिले असून, २ ते १५ ऑगस्ट या कालावधीत तीन टप्प्यांत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या असून अभियान यशस्वी करण्यासाठी तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

शासनाच्या सूचनेनुसार, हर घर तिरंगा अभियानांतर्गत प्रत्येक घरावर, तसेच शासकीय, निमशासकीय व खासगी कार्यालयांवर राष्ट्रध्वज फडकविण्यात येणार आहे. यासाठी बचत गट, स्थानिक उत्पादक व अधिकृत पुरवठादारांकडून राष्ट्रध्वजांचा पुरवठा सुनिश्चित करण्यात येणार आहे.

अभियानाचे तीन टप्पे पुढीलप्रमाणे आहेत: प्रथम टप्पा (२ ते ८ ऑगस्ट): स्वयंसेवक नोंदणी, जनजागृती, शाळा–महाविद्यालयांमधील कार्यक्रम, तिरंगामय वातावरण निर्मिती., द्वितीय टप्पा (९ ते १२ ऑगस्ट): विविध शासकीय व निमशासकीय उपक्रम, तिरंगा मेला, सांस्कृतिक कार्यक्रम व तिरंगा यात्रांचे आयोजन., तृतीय टप्पा (१३ ते १५ ऑगस्ट) : प्रत्येक घरावर राष्ट्रध्वज फडकविणे, सेल्फी विथ तिरंगा उपक्रम, अमृत सरोवर व सार्वजनिक स्थळांवर ध्वजारोहण.

अभियानात सहभागी होणाऱ्या नागरिकांनी www.harghartiranga.com या संकेतस्थळावर स्वयंसेवक नोंदणी व सेल्फी अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शाळा, महाविद्यालये व ग्रामपंचायतींनी विशेष सहभाग नोंदवावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

या अभियानासाठी प्रत्येक विभागांनी आपापल्या अर्थसंकल्पातूनच आवश्यक खर्च भागवावा. याशिवाय, तिरंगा रोषणाई, रंगोळी स्पर्धा, राखी निर्मिती कार्यशाळा, पत्र लेखन स्पर्धा व तिरंगा प्रदर्शन अशा विविध कार्यक्रमांच्या आयोजनाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर अभियानात कोणतीही अडचण आल्यास सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या नियुक्त अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी केले आहे.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता, देशभक्तीचा संगम

**'स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग' मोहीम ८ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविणार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी**

नगर – सांस्कृतिक मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून देशभरात 'हर घर तिरंगा' ही मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम आता राष्ट्रीय अभिमान व लोकसहभागाचा उत्सव ठरली आहे. यावर्षीच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त 'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' ही मोहीम 'स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग' या टॅगलाइनअंतर्गत पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय (नवी दिल्ली), सांस्कृतिक मंत्रालय व राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ते १५ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' या मोहिमेची संकल्पना लोकसहभागातून उत्सव व नागरी एकतेच्या भावनेवर आधारित असून स्वातंत्र्याची भावना स्वच्छता व सुजलतेशी जोडली आहे. पंतप्रधानांच्या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी ग्रामीण भागात स्वच्छ पाणीपुरवठा, शाश्वत स्वच्छता व आरोग्य सुनिश्चित करण्यासाठी थरङ्क (पाणी, स्वच्छता व आरोग्य) या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेचा शुभारंभ ८ ऑगस्ट रोजी जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर करण्यात येणार असून 'स्वच्छ सुजल गाव' ही प्रतिज्ञा नागरिक व शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घेतली जाणार आहे.

९ ते ११ ऑगस्ट या कालावधीत सार्वजनिक स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असून यामध्ये सार्वजनिक ठिकाणे, जलकुंभ, पाणी व स्वच्छता सुविधांची स्वच्छता केली जाणार आहे. गावातील विद्यार्थी व युवक यांच्या स्वच्छता रॅली, वैयक्तिक घरांमध्ये रांगोळी व रंगकाम, नाल्यांची स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, पाणीगळती शोधून ती थांबविणे, सार्वजनिक शौचालये, घनकचरा व्यवस्थापन केंद्रे, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन यामध्येही सहभाग घेण्यात येणार आहे. तसेच 'आझादी का श्रमदान' उपक्रमाअंतर्गत सार्वजनिक ठिकाणे व रस्त्यांची साफसफाई केली जाणार आहे.

१२ ऑगस्ट हा पायाभूत सुविधा स्वच्छता दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये जल जीवन मिशनअंतर्गत पाणी टाक्या, नळजोडण्या, पंप हाऊस इ. स्थळांची स्वच्छता व सजावट करण्यात येणार आहे. देशभक्तीपर थीमसह पाणी व स्वच्छता स्थळांचे रंगकाम व सजावट केली जाणार आहे. पायाभूत घटकांवर तिरंगी धागे बांधण्याचे कार्यक्रम होणार आहेत.

१३ ऑगस्ट रोजी स्वच्छता संवाद व जागरूकता दिन साजरा केला जाईल. यामध्ये कचरा व्यवस्थापन तांत्रिक प्रात्यक्षिके (वर्गीकरण, कंपोस्टिंग), शौचालय देखभाल, जलसंवर्धन, भूजल पुनर्भरण, जलस्रोत संरक्षण, एकल वापराचे प्लास्टिक टाळणे यासंदर्भात जनजागृती केली जाणार आहे. ग्रामस्थांच्या सहभागातून वैयक्तिक शौचालय स्वच्छता उपक्रमही राबविण्यात येणार आहे.

१४ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाची तयारी म्हणून सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, चौक, बाजारपेठा व पाणी–स्वच्छता स्थळांची अंतिम स्वच्छता व सजावट केली जाईल. ध्वजारोहणासाठी ठिकाण निश्चित करून त्या परिसराची साफसफाई केली जाणार आहे.

१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात येईल. यावेळी स्वच्छता वीर व स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात येणार असून, जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती व नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले यांनी केले आहे.

# नगर शहरात ९ ऑगस्टला जागतिक आदिवासी दिवस साजरा होणार

**सावेडीत आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या रॅलीचे आयोजन, विविध उपक्रमांचा समावेश**



नगर – आदिवासी सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने जागतिक आदिवासी दिन ९ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर शहरात उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने सावेडी येथे आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच आदिवासी नृत्यप्रस्तुती, मार्गदर्शन सत्रे आणि आदिवासी बालकलाकार व गुणवंतांचा सत्कार असे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ९ वाजता सावेडी येथील प्रोफेसर चौकातून रॅलीला प्रारंभ होणार आहे. रॅलीदरम्यान पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या कलाकारांकडून आदिवासी नृत्य सादर केले जाईल, ज्यातून समृद्ध आदिवासी परंपरेची झलक पहायला मिळेल. रॅलीनंतरचा मुख्य कार्यक्रम श्रेयस लॉन, भिस्तबाग महालाजवळ पार पडणार आहे. महानगरपालिकेच्या उपायुक्त सपना वसावा प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहून जल, जंगल, जमीन हे आदिवासींचे मूळ हक्क या विषयावर मार्गदर्शन करतील. तसेच प्रभाग अधिकारी एस.बी. तडवी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या प्रसंगी आदिवासी बालकलाकार तसेच आदिवासी वसतिगृहातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आदिवासी सेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व समाजबांधव परिश्रम घेत असून, सर्व समाज बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लहुजी वस्ताद साळवे व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांबाबत १० ऑगस्ट रोजी बैठकीचे आयोजन



नगर – आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे व साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांच्या उभारणी संदर्भात प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी बैठक १० ऑगस्ट रोजी सकाळी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे.


बैठक सिद्धार्थनगर येथील साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे चौकाजवळील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत होणार आहे. या बैठकीत सकल मातंग समाज, विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते, तसेच लहू सैनिक सहभागी होणार असून, लहुजी वस्ताद साळवे व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या सन्मानार्थ शहरात पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी कशी करता येईल, यावर व्यापक चर्चा होणार आहे.

बैठकीनंतर पूर्णाकृती पुतळा समिती स्थापन करण्यात येणार असून, ही समिती पुढील नियोजन, शासकीय परवानग्या, निधी संकलन, जागा निश्चिती, व मूर्तीकार निवड यांसारख्या महत्त्वाच्या टप्प्यांवर काम करणार आहे. या ऐतिहासिक उपक्रमात सर्व समाजबांधवांनी सक्रिय सहभाग घ्यावा, आपल्या उपस्थिती व मार्गदर्शनाने या उपक्रमास बळ द्यावे, असे आवाहन सकल मातंग समाजाने केले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## अमेझॉन नदी धोक्यात



ग्लोबल वॉर्मिंगमुळे सातत्याने कोरडा दुष्काळ पडत चालला असताना यामुळे जगातील सर्वात मोठी नदी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमेझॉन नदीला देखील फटका बसत आला आहे. या विशाल जलमार्गातील बहुतांशी हिस्से काही फूट खोलवर तलावाच्या रूपात शिल्लक रहात असून ही एक प्रकारे धोक्याची नांदी ठरते आहे. ब्राझिलियन भू संशोधक सेवा खात्याच्या आकडेवारीनुसार, दक्षिण अमेरिकेतील जवळपास ४ हजार मैल अंतर कापणाऱ्या या अमेझॉन नदीचा पाण्याचा स्तर मागील काही महिन्यात सातत्याने घटत चालला आहे.

१९६७ पासून या नदीचा डाटा एकत्रित करणाऱ्या ब्राझीलच्या अमेजॉनस राज्याच्या हिश्श्यातील या नदीतील पाण्याची पातळी सरासरी २५ फुटाने खाली गेली आहे. अमेझॉन नदीला येऊन मिळणाऱ्या बहुतांशी पूरक नद्यांची पातळी देखील खालावत चालली आहे. याचमुळे अमेझॉन नदीसमोर कधीही नव्हे इतका धोका निर्माण झाला आहे.

नॅशनल डिपार्टमेंट ऑफ ट्रान्स्पोर्ट इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक फॅब्रिकियो डी ओलिवेरा गेल्वाओ म्हणाले, अमेझॉन नदीचे पाणी इतके कमी झाले आहे की, काही ठिकाणी अगदी किनाऱ्यावर छोटी झाडे, रोपेही दिसून येत आहेत.

एरवी, अमेझॉन नदीत पुरेसे पाणी असताना पूल पार करून मुलांना शाळेत ने-आण करण्यासाठी तसेच रुग्णांना हॉस्पिटलमध्ये पोहोचण्यासाठी नावेने प्रवास करणे शक्य होते. मात्र, आता नदीतील पात्रे कोरडी पडत चालली असताना नाव सुद्धा हाकता येत नाही, अशी परिस्थिती काही ठिकाणी निर्माण झालेली आहे. आंतरराष्ट्रीय विनिर्माण केंद्र मनौसपर्यंत उथळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे १९८० नंतर ब्राझीलचे तापमान दोन डिग्री सेल्सियसने वाढले आहे आणि यानंतरही आणखी वाढ होणार, हे निश्चित आहे. अल निनोचा दीर्घकालीन परिणाम म्हणून पाऊस कमी होत चालला आहे. याचवेळी काही संशोधकांनी अमेझॉनसह अन्य नद्यांमध्ये होत असणारे खोदकाम धोकादायक असल्याचा इशारा यावेळी दिला आहे. अशा खोदकामामुळे नदीतील जीवसंपदेसमोर अस्तित्वाचा धोका निर्माण झाला असल्याचे त्यांनी येथे म्हटले आहे.

पाण्यात मालवाहू जहाजे घेऊन जाणे अवघड झाले असून यामुळे काही कंपन्यांनी यावर मार्ग काढत फ्लोटिंग डॉक उभारणे सुरू केले आहे. गेल्वाओ यांनी दिलेल्या माहितीनुसार, ब्राझीलमधील अमेझॉनमध्ये खोदकाम केले गेले होते. पण, पाण्याचा स्तर खालावला असल्याने आता नदीच्या तळाशी जाऊन खोदकाम करावे लागणार आहे. ◆◆◆

## हिवाळ्यात लिंबू पाणी पिताय?

उन्हाळ्यात मोठ्या संख्येने लोक लिंबू पाण्याचे सेवन करतात. लिंबू पाण्याच्या सेवनाने रोगप्रतिकारकशक्ती मजबूत होते तसेच यामुळे वजन कमी होण्यासाठी मदत होते. पण काहीजण हिवाळ्यात लिंबू पाणी पिणे टाळतात. बऱ्याच जणांना वाटतं की हिवाळ्यात लिंबू पाणी प्यायल्याने सर्दी, खोकला सारखे आजार होतात, पण खरंच हिवाळ्यात लिंबू पाणी पिणे टाळायला हवे का? याबाबत तज्ज्ञांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. आहारतज्ज्ञांच्या माहितीनुसार लिंबू पाणी पिणं प्रत्येक ऋतूमध्ये आरोग्यासाठी चांगलं ठरतं. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार हिवाळ्यात लिंबू पाणी प्यायल्याने आरोग्याला कोणतेही नुकसान होत नाही. हिवाळ्यात इन्फेक्शन आणि आजारांचे प्रमाण वाढते. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सीची मात्रा असते. ज्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती मजबूत होते. त्यामुळे आजारांचा धोका कमी होऊ शकतो. लिंबू पाणी नियमितपणे प्यायल्याने शरीरातील आजारांशी लढण्याची क्षमता वाढते, ज्यामुळे हिवाळ्यात सर्दी, खोकला, ताप यासारख्या आरोग्याच्या समस्या कमी होतात.



आहारतज्ज्ञांच्या मते हिवाळ्यात अनेकजण कमी पाणी पितात. काहीजण तर केवळ २ ते ४ ग्लासचं पाणी पितात. अशावेळी शरीरात पाण्याची कमतरता होते आणि डिहायड्रेशनचा धोका वाढतो. तेव्हा डिहायड्रेशन पासून वाचायचं असेल तर लिंबू पाण्याचे सेवन करणं फायदेशीर ठरू शकतं. हिवाळ्यात लिंबू पाणी प्यायल्याने त्वचा हेल्दी आणि हायड्रेटेड राहते. तसेच या ऋतूमध्ये अनेकजण जड अन्न आणि फॅटी फूड्सचे सेवन करतात त्यामुळे पचना संबंधित समस्या निर्माण होतात. लिंबू पाणी पचनक्रियेसाठी उपयोगी ठरते तसेच यामुळे लिव्हर डिटॉक्स करण्यासाठी सुद्धा मदत होते. आहारतज्ज्ञांच्या माहितीनुसार हिवाळ्यात कोमट पाण्यात लिंबू पिळून त्याचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक फायदे मिळतात. यामुळे बॉडी डिटॉक्स होण्यासाठी मदत मिळते, वजन कमी सुद्धा कमी होते. ◆◆◆

## डायनासोर होते समाजशील?



कोट्यवधी वर्षांपूर्वी नामशेष झालेल्या डायनासोरबाबत आजही आपल्याला कुतूहल वाटत असते. अनेक प्रजातीचे, वेगवेगळे डायनासोर त्या काळी अस्तित्वात होते. हे प्राणी आपल्याला वाटते त्याप्रमाणे एकलकोंडे नव्हते तर ते समाजशील प्राणी होते. ते कळपाने राहात असत व मरतानाही ते समूहाने मरत. ते आपण म्हणतो त्याप्रमाणे क्रूर नव्हते.

कॅनडातील अल्बर्टा विद्यापीठातील विद्यार्थी ग्रेगरी फन्स्टन यांनी सांगितले की, डायनासोरबाबतच्या कथा आहेत त्यानुसार ते क्रूर, महाकाय होते व बेदरकारपणे एकटे हिंडत होते, पण प्रत्यक्षात ते समूहाने राहात होते. आपण समजतो तसे ते नव्हते व आधुनिक प्राण्यांसारखे होते. ते समाजशील होते.

मंगोलियामध्ये डायनासोरचे काही जीवाश्म मिळाले होते. त्यात तुटलेल्या हाडांचा समावेश होता. वैज्ञानिकांनी त्याचा अभ्यास करून ॲविमिमस डायनासोरची जोडणी करून बघितली. आधुनिक काळात पक्षी थव्याने राहतात, तर त्या काळात पक्ष्यासारखे डायनासोर हे कळपानेच राहात होते. ते जगताना समूहाने जगत होते, पण मरतानाही समूहाने का मरत होते याचा उलगडा झालेला नाही. डायनासोर समाजशील नव्हते हा गैरसमज तर त्यामुळे दूर झाला आहे. क्रेटेशियस काळात डायनासोरचे समूह समाजशील बनले होते, पण तो निष्कर्ष जीवाश्मांच्या अभ्यासातून काढला आहे की आणखी काही तंत्र त्यात वापरले आहे हे समजलेले नाही. या प्राण्यांच्या हाडांचे जीवाश्म सापडले असून ते कळपाने राहात होते. ज्युरासिक व ट्रायसिक काळापेक्षा ते क्रेटेशियस काळात जास्त प्रबळ होते. पक्ष्यांचे पूर्वज मानल्या जाणाऱ्या या प्राण्यांच्या हाडांचा साठाच सापडल्याने हे नवीन संशोधन शक्य झाले आहे. सायन्टिफिक रिपोर्टस् या नियतकालिकात त्याबाबत माहिती प्रसिद्ध झालेली आहे. ◆◆◆

## भूत आणि विज्ञान



भूत हा एक असा विषय आहे ज्यावर लोकांची वेगवेगळी मते आहेत. काहींचा भुतांवर विश्वास असतो तर काहींचा नाही. काही म्हणतात की भूत हे वास्तव आहे, तर काही म्हणतात की ते फक्त मनाची कल्पना आहे. वास्तव काहीही असो, भूत असतात की नसतात हे आपल्या वैयक्तिक समजुतीवर अवलंबून असते, पण विज्ञान याबद्दल काय म्हणते, याबाबत संशोधकांनी यावर सविस्तर उहापोह केला आहे.

अमेरिकेच्या युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ कॅरोलिना येथील समाजशास्त्राचे प्राध्यापक बॅरी मार्कोव्स्की म्हणतात, अनेकांचा असा विश्वास आहे की भूत असतात. या विश्वासामागे त्याच्यासोबत घडलेल्या विचित्र घटना आहेत. उडणारी पुस्तके, दिवे चालू आणि बंद होणं विचित्र आवाज, चालण्याचा आवाज इत्यादी गोष्टींमुळे भूत अस्तित्वात असल्याचा लोकांचा विश्वास आहे, पण आपण विचार केला पाहिजे की भुतांचे अस्तित्व शक्य आहे का?

जर भुतं माणसांसारखी वागतात, म्हणजे ते वस्तू उचलून हवेत फेकत असतात किंवा आवाज करत असतात, तर याचा अर्थ असा होतो की या जगातल्या प्रत्येक वस्तू जशा बनल्या आहेत. तसेच ते बनले आहेत. आणि ते जिवंत असतील तर ते माणसांसारखे शौचालयात का जात नाहीत. भुते घरात पसारा करून ठेवतात, इकडच्या गोष्टी तिकडे ठेवतात, असे लोकांनी कधीच सांगितलेले नाहीत, मग लोक म्हणतात की भुते भिंतीवरून गेली. ते भिंतींमधून कसे जाऊ शकतात?

भौतिकशास्त्राशी संबंधित अनेक वर्षांच्या संशोधनानंतर असे आढळून आले की भूत अस्तित्वात असू शकत नाही. आजपर्यंत मानवी शरीराचा कोणताही अवयव मृत्यूनंतरही अस्तित्वात असल्याचा कोणताही पुरावा नाही. भुतांबद्दलच्या कल्पना टीव्ही शो आणि चित्रपटांमुळे निर्माण होतात. जेव्हापासून मोबाईलमध्ये कॅमेरा आणि वॉइस रेकॉर्डर आले आहेत, तेव्हापासून लोक अगदी लहान विचित्र आवाज किंवा दृश्ये रेकॉर्ड करत आहेत आणि त्यांना भुतांशी जोडू लागले आहेत. ●●●

## आरोग्यदायी चक्रफूल

भारतीय आहार आणि विविध मसाले यांचे हजारो वर्षांपासूनचे एक अतूट समीकरणच आहे. हे मसाले अन्नाची केवळ चवच वाढवतात असे नाही तर ते आरोग्याला विविध प्रकारे सहाय्यही करीत असतात. आधुनिक विज्ञानानेही अशा अनेक मसाल्यांचे महत्व अधोरेखित केलेले आहे. त्यामध्ये तीन हजार वर्षांपासून भारतीय आहारात असलेला एक मसाला म्हणजे स्टार ॲनिज किंवा चक्र फूल. हा एक असा मसाला आहे जो तुमच्या जेवणाची चवच वाढवत नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे.



हे एक लहान बीज आहे, पण त्याच्या आत अनेक गुण दडलेले आहेत. चक्र फूलमध्ये अँटीऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात जे पचन सुधारण्यास मदत करतात. अपचन, पोट फुगणे, बद्धकोष्ठता यासारख्या समस्यांपासून आराम मिळतो. चक्र फूलमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात ज्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. हे सर्दी, फ्लू आणि इतर संक्रमणांपासून संरक्षण करण्यास मदत करते. चक्र फूलमध्ये संवेदनाहारक गुणधर्म असतात जे वेदना कमी करण्यास मदत करतात. यामुळे डोकेदुखी, स्नायू दुखणे आणि सांधेदुखीपासून आराम मिळतो. चक्र फूलमध्ये अँटी-व्हायरल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात जे खोकला आणि सर्दीपासून आराम देतात. त्यामुळे श्वसनसंस्था निरोगी राहण्यास मदत होते. चक्र फूलमध्ये अँटीऑक्सिडंट असतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. हे रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्यास मदत करते. चक्र फूलमध्ये फायबर असते ज्यामुळे पोट भरलेले राहते आणि वजन कमी करण्यास मदत होते. हे चयापचय वाढवते आणि कॅलरी बर्न करण्यास मदत करते. चक्र फूल असे वापरावे... स्वयंपाकात : भात, करी, सूप आणि इतर पदार्थांमध्ये वापरता येतो.चहामध्ये : तुम्ही चक्र फूलपासून चहा बनवून पिऊ शकता. औषध म्हणून : चक्र फूल तेल किंवा कॅप्सूल वापरू शकता. सावधगिरी : चक्र फूलचे जास्त सेवन करू नका. गरोदर स्त्रिया आणि स्तनपान देणाऱ्या मातांनी चक्र फूल घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तुम्हाला कोणतीही ॲलर्जी असल्यास, चक्र फूल घेण्यापूर्वी तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ◆◆◆

## प्रेरणा कल्पवृक्षाची




नारळाच्या झाडाला आपल्याकडे कल्पवृक्षा ची उपमा दिली जात असते. याचे कारण म्हणजे या झाडाचा अनेक कारणांसाठी उपयोग होऊ शकतो. नारळाच्या झाडात जी वैशिष्ट्ये असतात त्याची यांत्रिक व अभियांत्रिकी नक्कल केल्यास भूकंप व नैसर्गिक आपत्तीत टिकू शकतील अशी घरे तयार करता येतात, असेही एका संशोधनात आढळलेले आहे हे विशेष!

नारळ हे त्याच्या कडक करवंट्यांसाठी प्रसिद्ध आहे. नारळाची झाडे ३० मीटर उंचीपर्यंत वाढतात त्या वेळी त्यांची फळे पक्व झालेली असतात व ती कितीही वरून कोसळली तरी फुटत नाहीत इतकी नारळाची करवंटी कडक असते म्हणजे ती धक्का सहन करू शकते. नारळाचे बी आतल्या भागात असते. त्याचे रक्षण करणे कठीण असते, त्यामुळे नारळाला पहिला तपकिरी रंगाचा नंतर चामड्यासारखा एक्सोकार्प व त्यानंतर धाग्यासारखा मेसोकार्प असे थर असतात. आतील एंडोकार्प हा थर खोबऱ्याच्या भोवती असला तरी त्यात नारळाचे बी असते. जर्मनीच्या फ्रेबर्ग विद्यापीठाचे संशोधक म्हणतात त्याप्रमाणे ही रचना फार वेगळी व उपयोगी आहे. नारळ पडताना आघाताची ऊर्जा कशी पसरली जाते याचा अभ्यास वैज्ञानिकांनी संप्रेषक यंत्र वापरून केली आहे. तुटलेल्या करवंट्यांचे नमुनेही यात अभ्यासासाठी घेण्यात आले व त्याची रचना समजून घेण्यात आली.

सूक्ष्मताशास्त्र व स्थानशास्त्राच्या दृष्टिकोनातून त्याचा अभ्यास करण्यात आला. त्यामुळे त्याचा वास्तुरचनेत उपयोग करणे शक्य आहे. नारळ फुटण्याच्या क्रियेचा अभ्यास करून तशा यांत्रिक रचना तयार करणे शक्य आहे. त्यात आघाताची ऊर्जा शोषली जात असते. एंडोकार्प थरात शिडीच्या आकारासारख्या लिग्निफाईड स्टोन सेल्स म्हणजे वेगळ्या पेशी असतात. त्यामुळे आघातामुळे त्यांना काही होत नाही. प्रत्येक पेशीला लिग्निफाईड रिंगचे संरक्षण समांतर पूल रचनेने दिलेले असते. एंडोकार्पमुळे नारळ पडल्यानंतरतही ऊर्जा पसरत जाते, असे शिमर यांचे मत आहे. नारळाच्या कवटीला तडे जातात, पण ते कठीण कवचाच्या आत पोहोचत नाहीत. नारळाला जाणाऱ्या भेगांची दिशा बदलते. एंडोकार्पमध्ये एका ठिकाणी चिर पडली तरी ती दुसऱ्या बाजूला पसरत नाही. यात व्हॅस्क्युलर संचाचा एक विशिष्ट कोन असतो, त्यामुळे तेच तंत्र कॉंक्रिटमधील कापडी धाग्यात वापरता येते, त्यामुळे त्या कॉंक्रिटने घराला तडे जातील, पण ते पसरणार नाहीत व भिंती कोसळणार नाहीत. त्यातून हलक्या वजनाची घरे तयार करून त्यात भूकंप, घरांवर दरडी कोसळणे व इतर आपत्तीत जीवितहानी टाळली जाऊ शकते, असे शिमर यांनी म्हटले आहे. ◆◆◆

## घड्याळाच्या शोधापूर्वीचा गजरमहिमा

ने घड्याळ हा आपल्या दैनंदिन आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. काही जण वेळ बघण्यासाठी मनगटावरचं घड्याळ आणि भिंतीवरच्या घड्याळाचा वापर करतात, तर काही जण मोबाईल फोनमधल्या घड्याळाचा वापर करतात. बहुतांश जण सकाळी लवकर उठण्यासाठी घड्याळाच्या गजराची मदत घेतात. मोबाईल फोनमधले घड्याळ असो किंवा पारंपरिक अलार्म क्लॉक, आपण ठरवलेल्या वेळेवर त्याचा गजर होतो आणि ते आपल्याला झोपेतून जागं करण्याचा प्रयत्न करतं. घड्याळाचा आणि त्यातल्या अलार्म सिस्टीमचा शोध लागला नव्हता, तेव्हा माणसं सकाळी लवकर कशी उठत होती, याचा कधी तुम्ही विचार केला आहे का?



प्राचीन काळी वेळ जाणून घेण्यासाठी शंकूयंत्र किंवा सौर घड्याळांचा वापर केला जात होता. त्यांच्या आधारे सूर्योदय ते सूर्यास्तापर्यंतचे तास मोजले जात होते. ज्योतिषशास्त्र, पंचसिद्धांतिका आणि सूर्यसिद्धांत या प्राचीन ग्रंथांनुसार, रात्रीची वेळ ताऱ्यांच्या स्थितीनुसार समजून घेतली जात होती.

कालांतराने, ग्रीस आणि इजिप्तमध्ये सनडायल बनवण्यात आले. याशिवाय, उंच खांबदेखील तयार केले गेले. ते सूर्यप्रकाशामुळे फिरणाऱ्या सावलीद्वारे वेळ दर्शवण्याचे काम करत होते. त्या वेळी अलार्म कसा लावला जात होता, याचा कुठेही उल्लेख नाही. ऑस्ट्रेलियातल्या रॉयल मेलबर्न इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटीने यावर संशोधन केले आहे. प्राचीन काळी आणखी एक शोध लागला होता. तेव्हा मेणबत्तीची घड्याळे बनवली जात होती. त्यात काही खिळे टाकले जात होते. मेण वितळल्यावर हे खिळे खाली असलेल्या ट्रेवर जोरात पडायचे. या आवाजामुळेदेखील झोपलेल्या व्यक्तीला जाग येत असे. हे प्रयोग पाहिजे तितके अचूक नव्हते. अशा परिस्थितीत मानसिक अलार्मवर अवलंबून राहावे लागत असे.

**मानसिक अलार्म म्हणजे काय?**

१७८७मध्ये लेव्ही हचिन्स यांनी अलार्म घड्याळाचा शोध लावला होता. अमेरिकेतल्या न्यू हॅम्पशायरमध्ये राहणाऱ्या हचिन्स यांनी स्वतः साठी एक घड्याळ बनवले होते. ते सकाळी ४ वाजता वाजत असे, जेणेकरून ते उठून कामावर जाऊ शकतील. १८७६मध्ये ई. थॉमस यांनी अशा घड्याळासाठी पेटंट मिळवले, जे कधीही अलार्म वाजवू शकते. त्यानंतरच अशा प्रकारची घड्याळं बाजारात येऊ लागली. ◆◆◆

## इतिहास रांगोळीचा

ना रांगोळीतील सुंदर रंग मन प्रसन्न करतात. खरं तर पूर्वी दररोज घरासमोर रांगोळी काढली जायची. मात्र, हल्ली ती परंपरा मागे पडत चालली आहे. पण अजूनही दसरा, दिवाळीच्या दिवसांत रांगोळी काढली जाते.

रांगोळीचेही खूप प्रकार आहेत. संस्कार भारती, ठिपक्यांची रांगोळी असे अनेक प्रकार आहेत. पण दारासमोर रांगोळी का काढली जाते, असा प्रश्न तुम्हाला कधी पडला आहे का? दारासमोर रांगोळी दिसायला तर सुबक दिसतेच मात्र घरासमोर रांगोळी काढण्याचे इतर अनेकही फायदे आहेत, असे सांगितले जात असते.

रांगोळी काढण्यामागे प्राचीन परंपरा असून त्याला काही धार्मिक आणि ऐतिहासिक कारणे आहेत. रांगोळीची परंपरा अगदी सिंधु संस्कृतीपासून सुरू असल्याचा उल्लेख सापडतो. संस्कृत भाषेत रांगोळीला रंगवल्ली असे म्हटले जाते. रंगाद्वारे भावना व्यक्त करणे असा या शब्दाचा अर्थ होतो. भारतात अनेक ठिकाणी अल्पना असंही रांगोळीला म्हणतात. अल्पना हा शब्द अलेपना या संस्कृत शब्दापासून तयार केला आहे. प्राचीन काळात लोकांचा असा विश्वास होता की कलात्मक चित्रांमुळं शहरं आणि गावं धनधान्याने समृद्ध राहतात तसेच वाईट शक्तींच्या प्रभावापासून सुरक्षित राहतात. याच दृष्टिकोनातून रांगोळी धार्मिक आणि सांस्कृतिक समारंभाच्या वेळी काढण्याची प्रथा सुरू झाली. असं म्हणतात की रांगोळी घरात येणाऱ्या अशुभ शक्तींना घराचा उंबरठा ओलांडू देत नाही. रांगोळी काढण्यासाठी आपण खाली जमिनीवर बसतो. त्यामुळं गुडघ्यांची हालचाल होते. सकाळी सकाळी आपोआपच गुडघ्यांचाही व्यायाम होतो. रांगोळीसाठी आपण हाताच्या बोटांचे समोरचे टोक वापरतो. बोटाच्या समोरच्या टोकांची आपण जितकी हालचाल करतो तितकाच मेंदू अधिक विकसित होतो, असं म्हटलं जातं. रांगोळी एका विशिष्ट खडकापासून तयार केली जाते. या खडकाचे नाव डोलोमाइट असं आहे. सर्वप्रथम हा दगड भट्टीत भाजून, बारीक कुटून मग वस्त्रगाळ करून वा चाळून काढतात. रांगोळीच्या दगडाला शिरगोळे असे म्हणतात. नागपूर जवळच्या कोराडी येथे शिरगोळे मोठ्या प्रमाणात सापडतात. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणावर रांगोळीचा व्यापार होतो. पांढऱ्या रांगोळीला वेगवेगळ्या प्रकारचे रंग देऊन रंगीत रांगोळी तयार केली जाते. ◆◆◆



